RNI NO. MAHMAR/2020/84035

कायदेविषयक मार्गदर्शन मोफत
संपर्क
ॲड. सिद्धार्थ
MVsc, MBA, LLM
मो नं ९४२२५३९४५१

# BAHUJAN SAURABHA
# बहुजन सौरभ

दि. २८ ऑगस्ट २०२६

१९३६ - नाभी सुधार समाज, संस्थेतर्फे नागपूर येथे समाज सुधारणा व शिक्षण या विषयावर जाहीर सभा.



संकलन प्रा. यशवंत दुपटे

रविवार ३० ऑगस्ट २०२६ | वर्ष : ६ | अंक : २४० | दैनिक | किंमत : ₹ ५/-
Sunday, 30 August 2026 | Year : 6 | Issue : 240 | Daily | Rate: Rs. 5/-

# IIM नागपुरात आरक्षित प्राध्यापक पदांचा मोठा बॅकलॉग

## 'आसरा'चे संचालकांना निवेदन

## OBC, SC, ST आणि EWS प्रवर्गातील 26 पदे रिक्त; विशेष भरती मोहीम राबविण्याची मागणी

**नागपूर :** भारतीय व्यवस्थापन संस्था (IIM) नागपूर येथे आरक्षित प्रवर्गातील प्राध्यापक पदांचा मोठा बॅकलॉग असल्याचा आरोप 'एसोसिएशन ऑफ सोशल अँड आरटीआय ॲक्टिव्हिस्ट्स' (ASRA) या संघटनेने केला आहे. केंद्र सरकारच्या आरक्षण धोरणाची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याचा दावा करत संघटनेचे अध्यक्ष संजय थुल यांनी IIM नागपूरचे संचालक तसेच व्यवस्थापन मंडळाच्या अध्यक्षांना निवेदन सादर केले आहे.

माहितीच्या अधिकारातून प्राप्त झालेल्या माहितीनुसार, IIM नागपूरने पत्र क्रमांक IIMN/CPIO/2026/339 द्वारे दिलेल्या माहितीत प्राध्यापक पदांमधील आरक्षणाची स्थिती स्पष्ट केली आहे. त्यानुसार, OBC प्रवर्गासाठी मंजूर १५ पदांपैकी केवळ २ पदे भरलेली असून १३ पदे रिक्त आहेत. SC प्रवर्गातील मंजूर ८ पदांपैकी २ पदे भरली असून ६ पदे रिक्त आहेत. ST प्रवर्गातील मंजूर ३ पदांपैकी एकही पद भरलेले नसून तिन्ही पदे रिक्त आहेत. तर EWS प्रवर्गातील मंजूर ४ पदांपैकी एकही पद भरलेले नसून चारही पदे रिक्त आहेत.

दुसरीकडे, अराखीव (UR) प्रवर्गातील मंजूर ३० पदांच्या तुलनेत ३१ प्राध्यापक कार्यरत असल्याचे RTI मधून समोर आल्याचा दावा 'आसरा'ने केला आहे. संघटनेच्या मते, एकूण ६० मंजूर प्राध्यापक पदांपैकी २५ पदे रिक्त आहेत. त्यापैकी OBC, SC, ST आणि EWS या आरक्षित प्रवर्गातील २६ पदे रिक्त असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. आरक्षित प्रवर्गासाठी नमूद केलेल्या ३० पदांपैकी २६ पदे रिक्त असल्याने आरक्षणाच्या अंमलबजावणीबाबत गंभीर प्रश्न निर्माण होत असल्याचे संजय थुल यांनी म्हटले आहे.

**विशेष भरती मोहीम राबविण्याची मागणी**

आरक्षित प्रवर्गातील रिक्त पदे तातडीने भरण्यासाठी विशेष भरती मोहीम (Special Recruitment Drive) राबविण्याची मागणी 'आसरा' संघटनेने केली आहे. तसेच रोस्टर पद्धतीचे काटेकोर पालन करून आरक्षित पदांवर पारदर्शक भरती प्रक्रिया राबवावी, अशी मागणीही करण्यात आली आहे. याशिवाय IIM नागपूरमधील सर्व शैक्षणिक तसेच बिगर-शैक्षणिक पदांचा बॅकलॉग निश्चित कालमर्यादेत भरावा, अशी मागणी संघटनेने केली आहे. आरक्षणाच्या घटनात्मक तरतुदींची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी संस्थेने ठोस पावले उचलावीत, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

दरम्यान, ३० दिवसांच्या आत या मागण्यांवर सकारात्मक निर्णय न झाल्यास शिक्षण मंत्रालय, राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोग, राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोग आणि राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाकडे तक्रार दाखल करण्याचा इशारा 'आसरा' संघटनेने दिला आहे.

आरक्षित प्रवर्गातील पदे दीर्घकाळ रिक्त राहिल्याने सामाजिक न्यायाच्या धोरणाच्या अंमलबजावणीवर प्रश्नचिन्ह निर्माण होत असून, या प्रकरणी IIM नागपूर प्रशासनाने पारदर्शक भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणीही संघटनेने केली आहे.

# नेपाळमधील मृतांचा आकडा 626 वर, अनेक जण अजूनही बेपत्ता

**काठमांडू :** नेपाळ आणि तिबेटमधील विनाशकारी पुरामुळं मृतांचा आकडा 600 च्या वर गेला असून 320 भारतीय नागरिकांसह 2400 हून अधिक लोक अजूनही बेपत्ता आहेत. पूरग्रस्त भागांमध्ये सध्या मदत आणि बचाव कार्य सुरू आहे. बेपत्ता झालेल्यांना शोधण्यासाठी एक मोठी बचाव मोहीम सुरू आहे. या पुरामुळं शहरं आणि गावं उद्ध्वस्त झाली असून घरं, वाहनं, रस्ते व पूल वाहून गेले आहेत. तसंच जलविद्युत प्रकल्पांचंही नुकसान झालं आहे.वृत्तानुसार, बेपत्ता झालेल्यांमध्ये 644 परदेशी नागरिकांचा समावेश आहे.



एनडीआरआरएमएनं जारी केलेल्या ताज्या आकडेवारीनुसार, अचानक आलेल्या पुरामुळं मृतांची संख्या 626 वर पोहोचली आहे, तर देशात 2400 हून अधिक लोक अजूनही बेपत्ता आहेत. नेपाळमधील आठ जिल्ह्यांतून मृतदेह बाहेर काढण्यात आल्याचं एनडीआरआरएमएनं म्हटलं आहे. तसंच अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, चितवनमधून 233, पूर्व नवलपरासीमधून 158, नुवाकोटमधून 51, गोरखातून 48, पश्चिम नवलपरासीमधून 47, धाडिंगमधून 45, तनहूमधून 31 आणि रसुवामधून 13 मृतदेह सापडले.

शनिवारी सकाळी नेपाळ पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नेपाळमधील विनाशकारी पुरामुळं मृतांचा आकडा 626 वर पोहोचला आहे, तर 2426 लोक बेपत्ता आहेत. बेपत्ता झालेल्यांमध्ये नेपाळ लष्कराचे 45 जवान, नेपाळ पोलिसांचे 27 जवान आणि नेपाळ सशस्त्र पोलीस दलाचे 13 जवान यांचा समावेश आहे. तसंच शोध, बचाव आणि मदत कार्यासाठी एकूण 8799 पोलीस कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत, असं पोलिसांनी सांगितलं. एनडीआरआरएमएनं शुक्रवारी सायंकाळी 7 वाजता दिलेल्या माहितीनुसार, बचाव कार्यासाठी 15,431 सुरक्षा कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. यामध्ये लष्कराचे 6,755 पोलीस दलाचे 4,473 आणि सशस्त्र पोलीस दलाचे 4,203 जवान आहेत.

नेपाळ पर्यटन मंडळानं शनिवारी सांगितलं की, विनाशकारी अचानक आलेल्या पुरामुळं नेपाळमध्ये अडकलेल्या 184 पर्यटकांची सुटका करण्यात आली आहे. सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स'वरील एका पोस्टमध्ये नेपाळ पर्यटन मंडळानं नमूद केलं की, 3 पर्यटक अधिकाऱ्यांच्या संपर्कात आहेत आणि 420 पर्यटक अद्याप संपर्काबाहेर आहेत. तसंच, या आपत्तीत बाधित झालेल्या आपल्या नागरिकांविषयी माहिती आणि मदत मिळवण्यासाठी विविध देशांच्या राजनैतिक दूतावासांशीही नेपाळ पर्यटन मंडळ समन्वय साधत असल्याचं त्यांनी सांगितलं.

## नेपाळमध्ये अडकलेले भाविक महाराष्ट्रात परतले

नेपाळ आणि तिबेटच्या सीमावर्ती भागातील महापुरात महाराष्ट्रातील २०० ते ४०४ नागरिक अडकल्याचा अंदाज व्यक्त केला जात असून, यातील सुमारे १०० ते १२५ नागरिकांचा गट सुरक्षित आहे. सुमारे ६० जणांचा गट बेपत्ता असल्याची भीतीही व्यक्त करण्यात येत आहे. तर, १०५ जण मायदेशी परतले आहे. यातच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने नेपाळमध्ये अडकलेले भाविक महाराष्ट्रात सुखरूप परतल्याची माहिती मुख्यमंत्री कार्यालयाकडून देण्यात आली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने नेपाळमध्ये अडकलेल्या १०० भाविकांचा महाराष्ट्राकडे सुरक्षित परतीचा प्रवास सुरू झाला आहे. नेपाळपासून पाटणापर्यंत भाविकांच्या सुरक्षित प्रवासासाठी आवश्यक समन्वय आणि सर्वतोपरी मदत करण्यात आली. महाराष्ट्रात सुखरूप परतण्यासाठी त्यांच्या रेल्वे प्रवासाचीही व्यवस्था करण्यात आली आहे. सर्व १०० भाविक पाटणाहून नागपूरकडे सुखरूप रवाना झाले. राज्य सरकार आणि मुख्यमंत्री कार्यालय त्यांच्या सुरक्षित परतीसाठी सातत्याने समन्वय साधत असून, सर्व भाविक लवकरच महाराष्ट्रात आपल्या घरी सुखरूप पोहोचतील, असे सांगण्यात आले आहे.

# "शिंदे-फडणवीसांनी माझ्या लेकरांचा तळतळाट घेतला" : मनोज जरांगे

जालना : मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी पुन्हा एकदा आंदोलनाची हाक देणारे मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी राज्य सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे. "माझ्या समाजाच्या लेकरांचं वाटोळं करून तुमची मुलं सुखी ठेवू नका आणि आम्ही ती राहूही देणार नाही," असा इशारा जरांगे यांनी दिला."शिंदे-फडणवीस यांनी माझ्या लेकरांचा तळतळाट घेतला," असा गंभीर आरोप करत त्यांनी सरकारला थेट आव्हान दिलं आहे. मराठा समाजाच्या मागण्या पूर्ण होईपर्यंत आंदोलन थांबणार नसल्याचंही जरांगे यांनी स्पष्ट केलं.



मराठा-कुणबी नोंदींच्या मुद्द्यावर बोलताना जरांगे म्हणाले, "कधी न मिळणाऱ्या 58 लाख नोंदी सापडल्याने लाखो पोरांचं कल्याण झालं. आता राहिलेल्या नोंदींची अंमलबजावणी करायची आहे. प्रत्येक वेळी सरकारकडून आश्वासन मिळालं, मात्र आता केवळ देतो, घेतो, वेळ द्या, असं चालणार नाही. राहिलेल्या मागण्यांची अंमलबजावणी करण्यासाठी हे शेवटचं आणि निर्णायक आंदोलन आहे."

"आता काही नंतर नाही. सर्व काही इथेच, जागेवर द्या," अशी भूमिका जरांगे यांनी मांडली. ते म्हणाले, "मराठा समाजानं गाफील राहू नये, सावध राहावं, दगा-फटका होण्याची शक्यता असल्याचा इशाराही त्यांनी दिला. मी मराठ्यांच्या लेकरांसाठी जीव द्यायला तयार झालो आहे. बलिदान गेलेल्या परिवारातील सदस्याला शासकीय नोकरी द्यावी. तोपर्यंत हे आंदोलन थांबणार नाही."

"मराठा समाज बांधवांनी तातडीने आंतरवाली सराटी येथे यावं", असं आवाहन जरांगे यांनी केलं. "कुणबी प्रमाणपत्र न मिळालेल्या मराठा समाज बांधवांनी तसेच हैदराबाद गॅझेटिअरनुसार अर्ज स्वीकारण्यात न आलेल्यांनी आंतरवालीत यावं. सारथीच्या माध्यमातून सुरू असलेल्या योजनांचे पैसे, तसंच पीएचडीचे थांबलेले पैसे तातडीनं द्यावेत. मराठा विद्यार्थ्यांकडून आकारलेली फीही सरकारनं तत्काळ परत करावी", अशी मागणी त्यांनी केली. "विद्यार्थ्यांनी कायदेशीर मार्गानं आंदोलनात सहभागी व्हावं आणि कायद्याच्या बाहेर जाऊन कोणतंही आंदोलन करू नये. आंदोलनात सहभागी होताना सर्वांनी काळजी घ्यावी", असंही त्यांनी सांगितलं.

मराठा समाजाच्या मागण्या आंतरवाली सराटीत पूर्ण झाल्या नाहीत तर मुंबईकडे जाण्याचा इशारा जरांगे यांनी दिला. "पोरांनो धीर धरा, मुंबईला जाऊ. वर्षा बंगल्यावर जाऊ. मराठा आंदोलकांवर पोलिसांकडून कारवाई झाली तर त्याचे गंभीर राजकीय परिणाम होतील", असा इशाराही त्यांनी दिला. आपल्या गावातील मराठ्याचा नेता आंतरवाली सराटी येथे आला नाही, हे लक्षात ठेवा आणि मला सांगा. पुढील निवडणुकीत अशा नेत्यांचा राजकीय हिशेब चुकता करण्याचं आवाहनही त्यांनी केलं. "भाजप आणि शिवसेनेच्या कार्यकर्त्यांकडून गावात दबाव आणला जात असेल तर आपल्याला माहिती द्यावी", असंही जरांगे यांनी म्हटलं.

# डॉ. विभूतीचंद्र गजभिये यांना आंतरराष्ट्रीय नेल्सन मंडेला पुरस्कार

## लंडन हेरॉल्डच्या मुखपृष्ठावर मिळवला बहुमान

**पुणे:** सामाजिक क्षेत्रातील २५ वर्षांचे प्रदीर्घ योगदान, दर्जेदार लेखनकार्य आणि प्रभावी संघटनात्मक कौशल्याची आंतरराष्ट्रीय स्तरावर दखल घेत भूमी अभिलेख विभागातील शासकीय कर्मचारी डॉ. विभूतीचंद्र गजभिये यांना प्रतिष्ठेच्या 'आंतरराष्ट्रीय नेल्सन मंडेला २०२६' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

लंडन येथील प्रसिद्ध 'लंडन हेरॉल्ड आंतरराष्ट्रीय मॅगझिन'ने आपल्या मुखपृष्ठावर डॉ. गजभिये यांच्या कार्याला विशेष स्थान दिले आहे. असा दुर्मिळ बहुमान मिळवणारे ते महाराष्ट्रातील पहिलेच समाजसेवक आणि शासकीय कर्मचारी ठरले आहेत.




हा विशेष पुरस्कार वितरण सोहळा २४ ऑगस्ट २०२६ रोजी पुण्यातील स्वारगेट येथील मराठा चेंबर ऑफ कॉमर्स येथे उत्साहात पार पडला. लंडन येथील प्रख्यात संशोधक व लेखिका डॉ. लुसिया हेनरी यांच्या शुभहस्ते डॉ. गजभिये यांना हा आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आला. डॉ. गजभिये यांनी शासकीय सेवेत कार्यरत असतानाही पाव शतकापासून सामाजिक, संघनात्मक आणि साहित्यिक क्षेत्रात सातत्याने उल्लेखनीय कार्य केले आहे. त्यांच्या या यशाबद्दल विविध स्तरातून आणि सामाजिक वर्तुळातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# नरेंद्र मोदी 4 दिवसीय परदेश दौऱ्यासाठी रवाना

**नवी दिल्ली :** प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या चार दिवसीय परदेश दौऱ्याला आजपासून (29 ऑगस्ट) सुरुवात झाली आहे. नरेंद्र मोदी 29 ऑगस्ट ते 01 सप्टेंबर या कालावधीत उझबेकिस्तान आणि किर्गिस्तानला या दोन देशांना भेट देणार आहेत. तसंच शांघाय सहकार्य संघटनेच्या (एससीओ) 26 व्या शिखर परिषदेला नरेंद्र मोदी उपस्थित राहणार आहेत. यावेळी किर्गिझ प्रजासत्ताकाची राजधानी बिश्केक इथं एससीओ शिखर परिषद आयोजित करण्यात आली आहे. दरम्यान, आपल्या परदेश दौऱ्यावर निघण्यापूर्वी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सांगितलं की, सुरक्षा, संपर्क आणि संधी यांवर आधारित असलेल्या एससीओ शिखर परिषदेसाठीच्या भारताच्या दृष्टिकोनाला पुढं नेण्यास आणि दहशतवादाच्या धोक्यापासून मुक्त प्रदेश उभारण्यासाठी सहकारी सदस्यांसोबत मिळून काम करण्यास ते उत्सुक आहेत. उझबेकिस्तान आणि किर्गिझ प्रजासत्ताक या दोन देशांच्या दौऱ्यापूर्वी नरेंद्र मोदी यांनी असाही विश्वास व्यक्त केला की, या दौऱ्यामुळं मध्य आशियातील भारताची सामरिक भागीदारी अधिक मजबूत होईल.



# गोरखपूर-पनवेल एक्सप्रेसमधून पडला पैशांचा पाऊस

**गोरखपूर :** गोरखपूरहून पनवेलला येणाऱ्या एक्सप्रेस ट्रेनमधून पीपीगंज रेल्वे स्टेशनजवळ लाखो रूपयांच्या पैशांचा पाऊस पडल्याची घटना समोर आली आहे. या घटनेने परिसरात आणि आसपासच्या गावांमध्ये चांगलीच चर्चा रंगली होती. पीपीगंज भागातून ट्रेन जात असताना अचानक ५००-५०० रूपयांच्या नोटा हवेत उडू लागल्या. त्यावेळी तिथे आसपासचे लोक आणि स्टेशनवरील लोकांनी हे पैसे जमा करण्यासाठी गर्दी केली.



ही रक्कम किती होती, ती कुणी फेकली याबाबत अधिकृत माहिती समोर आली नाही. परंतु या घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी पोहचले. परंतु तिथे कुणी सापडले नाही. ही घटना गुरुवारी सकाळी ६ च्या सुमारास घडली. गोरखपूरहून पनवेलला जाणारी एक्सप्रेस पीपीगंज रेल्वे स्टेशनच्या प्लॅटफॉर्म २ वरून पुढे जात होती. या ट्रेनचा पीपीगंज स्टेशनला थांबा नाही. त्याचवेळी ट्रेनमध्ये बसलेल्या एका प्रवाशाने ५००-५०० च्या नोटांनी भरलेली पिशवी खिडकीतून बाहेर फेकली. मात्र वाऱ्यामुळे पिशवीतील नोटा हवेत उडाल्या. या नोटा पाहून स्टेशनवरील लोकं त्या जमा करण्यासाठी सैरावैरा पळू लागले. काही वेळातच लोकांनी खाली पडलेल्या नोटा गोळा केल्या आणि तिथून निघून गेले.









30 August 2026 page 02_Layout 1 29-08-2026 06:27 PM Page 1



# मनुस्मृतीवर हल्ला म्हणजे विषमतेवर हल्ला!

भारतीय लोकशाहीची खरी ताकद विविध विचार, श्रद्धा, परंपरा आणि मतभेदांना सामावून घेण्यात आहे. मात्र, जेव्हा एखादी जुनी सामाजिक व्यवस्था माणसामाणसांत भेद निर्माण करते, जन्माच्या आधारावर श्रेष्ठ-कनिष्ठ ठरवते आणि समानतेच्या तत्त्वाला आव्हान देते, तेव्हा तिच्यावर प्रश्न उपस्थित करणे हा देशद्रोह नसतो; उलट तो लोकशाहीचा जिवंतपणा असतो. म्हणूनच आज मनुस्मृतीवर थेट प्रश्न उपस्थित करणाऱ्या आवाजांकडे केवळ राजकीय चष्म्यातून न पाहता सामाजिक परिवर्तनाच्या संदर्भात पाहण्याची गरज आहे. मनुस्मृतीचा विषय हा केवळ एका ग्रंथाचा विषय नाही. तो भारतीय समाजव्यवस्थेतील विषमता, जातिभेद आणि सामाजिक न्यायाच्या संघर्षाशी जोडलेला विषय आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २५ डिसेंबर १९२७ रोजी मनुस्मृतीचे दहन करून सामाजिक विषमतेविरुद्ध ऐतिहासिक भूमिका घेतली. त्यांचा संघर्ष कोणत्याही व्यक्तीविरोधात नव्हता; तो माणसाला माणूस म्हणून समान प्रतिष्ठा नाकारणाऱ्या व्यवस्थेविरोधात होता.




आजच्या काळात मनुस्मृती, जातिव्यवस्था आणि सामाजिक समानता यावर बोलणारा नेता राजकीयदृष्ट्या वेगळ्या प्रकारचा संदेश देतो. राहुल गांधी यांनी अशा प्रश्नांना सार्वजनिक चर्चेच्या केंद्रस्थानी आणण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या भूमिकेशी कोणाचे राजकीय मत जुळेल किंवा जुळणार नाही, हा वेगळा प्रश्न आहे. परंतु सामाजिक विषमता, संविधान, आरक्षण, प्रतिनिधित्व आणि जातीय वास्तव यावर देशात उघडपणे चर्चा व्हावी, ही बाब लोकशाहीसाठी महत्त्वाची आहे.

मनुस्मृतीवर टीका केली की ती विशिष्ट संघटना किंवा विचारसरणीवर टीका आहे, असे समीकरण सरसकट मांडणे धोकादायक आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि मनुस्मृती यांना एकच मानणे ऐतिहासिकदृष्ट्या आणि वैचारिकदृष्ट्या अधिक सखोल चर्चेची मागणी करते. मात्र, एखाद्या संघटनेला मनुस्मृतीच्या विचारांशी जोडून राजकीय आरोप-प्रत्यारोप करण्याऐवजी तिची स्वतःची अधिकृत भूमिका तपासली पाहिजे. लोकशाहीत आरोपांपेक्षा तथ्य महत्त्वाचे असतात. देशभक्तीची व्याख्याही आपण नव्याने समजून घेतली पाहिजे. देशभक्ती म्हणजे केवळ घोषणाबाजी नव्हे. देशभक्ती कोणावर लादता येत नाही. ती नागरिकांच्या वर्तनात, संविधानाचा आदर करण्यात, कायद्याचे पालन करण्यात, दुर्बलांच्या अधिकारांचे संरक्षण करण्यात आणि देशाच्या प्रगतीसाठी प्रामाणिक योगदान देण्यात दिसते. जो नागरिक आपल्या देशातील प्रत्येक माणसाला समान सन्मान मिळावा यासाठी उभा राहतो, तोही देशभक्तच आहे.



प्रा. संध्या राजुरकर
निवासी संपादक

महात्मा गांधींपासून आजच्या राजकारणापर्यंत ‘गांधी’ या नावाभोवती देशभक्ती, राष्ट्रवाद आणि जनसेवेच्या विविध व्याख्या मांडल्या गेल्या. प्रत्येक काळात राजकीय गरजेनुसार या संकल्पनांचा अर्थ बदलताना दिसतो. त्यामुळे कोणाची देशभक्ती खरी आणि कोणाची खोटी, याचा अंतिम निर्णय घोषणांनी नव्हे तर कृतीने झाला पाहिजे.

राहुल गांधींच्या राजकारणातील एक महत्त्वाचा पैलू म्हणजे ते सामाजिक प्रश्नांना राजकीय चर्चेच्या मध्यभागी आणण्याचा प्रयत्न करतात. जातीय जनगणना असो, सामाजिक प्रतिनिधित्व असो किंवा आर्थिक विषमता, या प्रश्नांवर चर्चा करणे म्हणजे समाजात फूट पाडणे नव्हे. उलट, दडवून ठेवलेल्या वास्तवाकडे डोळसपणे पाहणे होय.

याउलट, सत्तेतील कोणत्याही नेत्याने लोकांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष केले, टीकेला शत्रुत्व मानले किंवा प्रश्न विचारणाऱ्यांना राष्ट्रविरोधी ठरवण्याचा प्रयत्न केला, तर लोकशाही कमकुवत होते. हे कोणत्याही एका व्यक्तीपुरते मर्यादित नाही. आज नरेंद्र मोदी सत्तेवर आहेत म्हणून त्यांच्यावर टीका करणे हा देशविरोध नाही. त्याचप्रमाणे राहुल गांधींवर टीका करणेही लोकशाहीविरोधी नाही. व्यक्तीपेक्षा संविधान आणि लोकशाही व्यवस्था मोठी आहे. आज भारताला व्यक्तिपूजेपेक्षा विचारांची गरज आहे. ‘राहुल गांधी जिंदाबाद’ किंवा ‘नरेंद्र मोदी जिंदाबाद’ या घोषणांपेक्षा ‘संविधान जिंदाबाद’, ‘समानता जिंदाबाद’ आणि ‘मानवी प्रतिष्ठा जिंदाबाद’ या मूल्यांना अधिक महत्त्व दिले पाहिजे. कारण शेवटी प्रश्न राहुल गांधी विरुद्ध नरेंद्र मोदी असा नाही. प्रश्न आहे - भारत कोणत्या दिशेने जाणार? जन्मावर आधारित विषमता स्वीकारणारा भारत की संविधानाने दिलेल्या समानतेच्या मार्गावर चालणारा भारत? डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेले संविधान आपल्याला स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्यायाची दिशा दाखवते. म्हणून मनुस्मृतीवर प्रश्न उपस्थित करणाऱ्या प्रत्येक विचाराकडे वैचारिक चर्चेच्या दृष्टीने पाहिले पाहिजे. कोणत्याही ग्रंथाला, नेत्याला किंवा संघटनेला अंधपणे पूजण्याऐवजी तर्काच्या कसोटीवर तपासले पाहिजे. भारताला आज सर्वाधिक गरज आहे ती द्वेषाची नव्हे, तर बंधुत्वाची; अंधभक्तीची नव्हे, तर विवेकाची; घोषणांची नव्हे, तर कृतीची. माणूस मोठा की व्यवस्था? जन्म मोठा की कर्तृत्व? जात मोठी की मानवता? या प्रश्नांची उत्तरे आपण कोणत्याही नेत्याकडून नव्हे, तर आपल्या विवेकबुद्धीकडून मागितली पाहिजेत. कारण खरा राष्ट्रवाद तोच, जो प्रत्येक भारतीयाला समान माणूस मानतो आणि संविधानाला सर्वोच्च मानतो.●●

---

# मी हिंदू की मुस्लिम
## दंगलीत पडला प्रश्न ?

**25 ऑक्टोबर 2001 ची दुपार... 2 वाजलेले.. नागपूरला लोकमतचा पां. वा. गाडगीळ पुरस्कार वितरण सोहळा दुसऱ्या दिवशी 26 ऑक्टोबरला होता. मला उत्कृष्ट बातमीसाठी मिळालेला पुरस्कार स्वीकाण्यासाठी मनमाडहून रेल्वेने जायचे होते. म्हणून माझी तयारी सुरु होती. दुपारी मालेगावच्या छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याजवळ बूट पॉलिश करत होतो. सोबत एमएटी दुचाकी होती आणि अचानक गलका सुरु झाला, हो गई. मालेगावकरांच्या भाषेत दंगल झाली, म्हणजेच हो गई.**




बुटांची अर्धी पॉलिश झालेली. तसेच बूट उचलले एक पायात नि दुसरा दुचाकीच्या कॅरीत. जुन्या बस स्थानकानजिक डॉ. आंबेडकर पुतळ्याजवळ पोलिसांनी रस्ता अडवलेला होता. प्रचंड पोलीस बंदोबस्त होता. जवळच पोलीस नियंत्रण कक्ष असल्यामुळे पोलीस कुमुक मोठी असली तरी जमाव नियंत्रणाबाहेर होता. किडवाई रस्त्यावर बाटा दुकानाशेजारी देशपांडे यांचे पंख्यांचे दुकान दंगलखोरांनी जाळल्याने त्यांनी हंबरडा फोडलेला... तसाच कार्यालयात परत आलो. पुरस्कार वितरण कार्यक्रमाला जायचे रद्द करून दंगलीचे रिपोर्टींग सुरु झालेले. नाशिकचे मालेगावात आलेले काही सहकारी अडकलेले होते. कर्फ्यू लागलेला आणि गोळीबारात कोण आणि किती गेले याची माहिती घेत असताना सायंकाळी नाशिकहून संपादकीय टीम मदतीसाठी आली. काही सहकाऱ्यांना पोलिसांनी दंडुके दिल्याने त्यांनी कामावर येण्यास नकार दिला, तर ऑपरेटरकडे ओळखपत्र नसल्याने तो घरी निघून गेला. सर्वत्र संचारबंदी होती. वाडिया रुग्णालयात मृतदेह आणि जखमींची माहिती घेण्यात दिवस गेला. कर्फ्यूमुळे घरी कुणी आठ-दहा दिवस जाऊ शकले नाही. पहिल्याच दिवशी माझा सहकारी मगनसिंग पाटील घटनास्थळी अडकला होता. रात्री सर्वजण कार्यालयातच अडकले. बाहेर कर्फ्यू आणि आत भुकेची चिंता. त्यावेळी लोकमत सखी मंचच्या सदस्या स्वर्गीय मंगला ओस्तवाल यांचा फोन आला. “दंगलखोर आले, आवाज येतोय,” असे त्या म्हणाल्या. बाहेर कर्फ्यू असतानाही मी आणि मगनसिंग एका पोलिसाला मॅनेज करून लपतछपत त्यांच्या घरी पोहोचलो. त्यांनी गरमागरम वरण-भात करून दिला. डबा घेऊन कार्यालयात सुरक्षित परतलो. त्यानंतर काही दिवस आमच्या कॉम्प्लेक्समधील चेतना डायनिंगने आमच्या उदरनिर्वाहाची काळजी घेतली. रात्री सखी मंचसाठी आलेल्या गिफ्टच्या रिकाम्या खोक्यांत आम्ही काही दिवस जमिनीवर झोपलो. मध्येच फोन खणखणायचे, इकडे जाळपोळ, तिकडे फायरिंग आणि असंख्य अफवा. छायाचित्रकार दीपकने दंगलीचे फोटो काढले; मात्र रोल देऊन तो निघून गेला. कर्फ्यूमुळे तो नाशिकला पोहोचवणेही आव्हान होते. रोल सटाणा नाका भागात पोहोचवला आणि तेथून टेहरेचे वार्ताहर रवींद्र शेवाळे यांनी तो नाशिकला पाठवला. नंतर ते फोटो प्रसिद्ध झाले. पत्रकार परिषदांना जाताना माझी खरी कोंडी होत होती. मी मराठी दैनिकाचा पत्रकार असल्याने प्रांत कचेरीत उर्दू पत्रकार मोकळेपणाने बोलत नव्हते आणि मी मुस्लिम असल्याने मराठी पत्रकारही मोकळे बोलत नव्हते. दोन्ही बाजूंनी



शफीक शेख
मो. 9420588366

कोंडीत पकडल्यासारखी अवस्था झाली. पहिल्याच रात्री कॅम्पमधील ईदगाह मैदानाजवळील जेएटी महिला महाविद्यालयाच्या प्राचार्य स्वर्गीय मनोरमा कामले यांचा फोन आला. त्या खिडकीतून ईदगाह मैदानावर दंगलखोर नुकसान करत असल्याचे सांगत होत्या. मी त्यांना काहीही बोलू नका, अन्यथा तुमच्या घराकडेही ते येतील, असे सांगितले. प्रांत कार्यालयात मंत्री छगन भुजबळ यांची पत्रकार परिषद सुरू असताना रिपाई नेते स्वर्गीय चंदन म्हसदे म्हणाले, “साहेब, लोकमतचे शफीक शेख यांचेही घर दंगलखोरांनी जाळले.” मी त्यांना नाही सर, असे म्हणालो; पण मनात भीती निर्माण झाली. लोकमतची गाडी घेऊन टिळक नगरातील माझ्या गल्लीत गेलो. तिथे एका मुस्लिम शिक्षिकेचे घर जळत होते आणि काही घरांचे अंतर सोडून माझे घर होते. तिसऱ्या दिवशी गावकरीचे तत्कालीन कार्यालय प्रमुख स्वर्गीय के. जी. भामरे यांनी गाडी घेऊन मला घरी पाठवले. कुटुंबाला घेऊन कर्फ्यूमध्ये नाशिककडे निघालो. दाभाडीपर्यंत सर्वत्र जाळपोळ आणि शुकशुकाट होता. कसेतरी वाट काढत टेहरेमार्गे नाशिक गाठले. कुटुंब नाशिकला सोडून वृत्तपत्र पार्सलच्या गाडीने पुन्हा मालेगावात दाखल झालो. गाव जळत होते, सर्वजण हिंदू-मुस्लिम करत होते; पण मला मुस्लिम असल्यामुळे कुठेही त्रास झाला नाही. नंतर कर्फ्यूमध्ये पंधरा मिनिटे, अर्धा तास अशी सूट मिळू लागली. त्याचवेळेत जेवण करून परतायचे. नंतर नुकसानीची पाहणी सुरू झाली. मुख्यमंत्री नारायण राणे यांनी दौरा केला. स्वर्गीय निंबा कदम यांची नवकिरण सायजिंग दंगलखोरांनी जाळल्याने ते राणे यांना हमसून रडत सांगत होते. शिवसेनेचे तत्कालीन जिल्हाप्रमुख अल्ताफ खान मालेगावच्या बाह्य हिंदू भागात शिवसैनिकांसोबत नुकसानीची पाहणी करत होते. त्यावेळी अल्ताफ खान आणि मी पत्रकार म्हणून नुकसानग्रस्तांना भेटत होतो. शहरातील सर्व नुकसानीची चर्चा करताना आमच्यात जात-पंथ नव्हता. केवळ माणूस म्हणून आम्ही आमचे कर्तव्य पार पाडत होतो. त्यानंतर दोन वेळा बॉम्बस्फोट झाले. त्याचेही वृत्तसंकलन केले. 25 वर्षे मालेगावी पत्रकारिता केली. जिथे लोक दंगलीचे गाव म्हणून बदलीवर जायला घाबरायचे त्या गावात मालेगाकरांनी दिलेले प्रेम कायम लक्षात राहिले.●●

---

# वर्तमानातील समस्यांकडे दुर्लक्ष नको...




अलीकडे २०४७ मध्ये देश विकसित होण्याची स्वप्न मोठ्या प्रमाणात रंगवली जात आहेत. परंतु ते साकारण्यासाठी वर्तमानातील समस्यांकडे दुर्लक्ष करून कसे स्वप्न साध्य करता येईल? आर्थिक विषमता, शिक्षण क्षेत्रातील भ्रष्टाचार, बेरोजगारी, ग्रामीण भागातील प्राथमिक सोयीसुविधांचे विदारक चित्र, रेवडी संस्कृतीतून आर्थिकदृष्ट्या खंगत चाललेली राज्ये, बंद होणाऱ्या सरकारी शाळा आणि चालू शाळांची दुरावस्था, अतार्किक बाबींचा आग्रह, भ्रष्टाचाराने पोखरून निघालेली, नागरिक स्नेही नसलेली प्रशासकीय व्यवस्था, अल्पावधीत खचणारे पूल आणि रस्ते, कंत्राटदार, अधिकारी, राजकारणी यांची भ्रष्ट शृंखला अश्या असंख्य समस्यांची वर्तमानात असलेली मालिका दुर्लक्षित करून २०४७ चे स्वप्न मृगजळी आहे हे विवेकी नागरिक जाणतात. देश विकसित होण्यासाठी आधुनिक शिक्षणाच्या सोयी, सर्वांना समान संधी, सौहार्दाचे वातावरण असणे गरजेचे आहे. विरोधी, विवेकी आवाजाची संभावना विविध विशेषणे देऊन न करता त्यातील विधायक सूचनांचा स्विकार करून प्रतिसाद देणे गरजेचे आहे. शिक्षण क्षेत्रातील सिलॅबसमध्ये बदलाव करून आधुनिक आणि भविष्याचा वेध घेऊन अभ्यासक्रम आखणे गरजेचे आहे. स्वयं रोजगारासाठी पोषक वातावरण, पुरेसा कर्जपुरवठा, बाजारपेठांची उपलब्धता निर्माण करावी लागेल. धार्मिक ध्रुवीकरणात विभाजित समाज आपली एकजूट शक्ती विकासात कशी झोकणार? मूळ समस्या दुर्लक्षित करून कसा विकास शक्य आहे? प्रामुख्याने ज्या पिढीला विकसित भारत सुपूर्द करायचा आहे ती पिढी आज आपल्यावर होणाऱ्या अन्यायाचा पाढा वाचत आहे. प्रामुख्याने शिक्षण क्षेत्रातील समस्या एका रात्रीत निर्माण झाल्या नाहीत. ही संघटीत भ्रष्टाचाराची साखळी आहे. त्यामुळे ग्रामीण भागात सोसावा लागणारा त्रास आता मुली मोकळेपणाने मांडत आहेत. समाज आणि नागरिक म्हणून आपण जी स्वार्थी आणि आत्मकेंद्री भूमिका घेऊन वाटचाल केली त्याचे हे दुष्परिणाम आहेत. त्यांच्यात विश्वास निर्माण होणारी प्रक्रिया राबविणे ही आपली प्राथमिकता हवी. सत्ता विशिष्ट उद्योगाची पाठराखण करणारी नसावी याची जाणीव हवी. प्रामुख्याने नागरी संघटनांचा आवाज दडपण्याऐवजी त्यांच्या सकारात्मक सुचनांवर अंमल केला जावा. रस्ते, विज, शुद्ध पाणी, रोजगार संधी, कारभारात पारदर्शिता याबाबी देशाच्या विकासात नागरिकांचे योगदान वाढविण्यासाठी महत्वाच्या आहेत. सरकारमधील उच्चपदस्थ आर्थिक सल्लागार नागेश्वरन यांनी एका अग्रगण्य इंग्रजी दैनिकात अलीकडेच पेट्रोल विषयक लिहिलेल्या एका लेखातून सूचना केल्या की लोकांना त्यांच्या इच्छेप्रमाणे पेट्रोल विषयक पर्याय उपलब्ध असावेत. शेती, अन्नधान्य आणि जुनी वाहने प्रभावित होणार नाहीत अश्या योजना असाव्यात अशी त्यांनी सूचना या लेखातून केली आहे. इतरही विश्लेषक जी मांडणी करतात त्यातील तथ्य आणि सूचनांची दखल घेऊन निर्णय अपेक्षित आहेत. वेगवेगळ्या आंदोलनातून वर्तमानात विविध घटक अस्वस्थ आणि असमाधानी असल्याचे चित्र आहे. या अस्वस्थ घटकांत विश्वास निर्माण होईल ही वर्तमानाची हाक ऐकली गेली तरच २०४७ च्या स्वप्नांची पूर्ती शक्य आहे.●●



अनिरुद्ध कांबळे
मो.9922959770

---

# वास्तव नागपूर दीक्षाभूमीचे

**भारत तथा परदेशात राहणाऱ्या भारतीय बौद्धांचे नागपूर दीक्षाभूमी श्रद्धास्थान आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अशोक विजया दशमी दि. १४ ऑक्टोबर, १९५६ रोजी आपल्या लाखो लोकांना बुद्ध धम्माची दीक्षा दिली. सांस्कृतिक स्वातंत्र्याची ती सुरुवात होती. निर्वाणाचे परम सुखप्राप्तीचा मार्ग खुला झाला होता. ती दीक्षाभूमी म्हणजे भारतीय बौद्ध जनतेचे पंढरपूर आहे.**




बुद्धगया, सारनाथ, लुंबिनी, कुशीनारा यानंतर दीक्षाभूमी हे बौद्धांचे तीर्थ क्षेत्र आहे. लाखो बौद्ध अशोक विजयादशमीचे दिवशी पाऊस पाणी याची पर्वा न करता दीक्षाभूमीवर १९५६ पासून एकत्र येत आहेत. ही जागा कशी मिळाली, दीक्षाभूमी स्तूप कसा उभा राहिला, आज कार्यक्रम व्यवस्था कशी करण्यात येते, दीक्षाभूमी नियंत्रण कोण करते याची पूर्ण आणि उचित माहिती लोकांना नाही. त्यामुळे अपेक्षा आणि त्यांचा भंग होत असल्याचे आपण पाहात आहोत. जनतेसाठी दीक्षाभूमी बौद्ध धर्म तीर्थ स्थळ परंतु कायद्याने ते भारताचे राष्ट्रीय महापुरुष म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राष्ट्रीय स्मारक आहे. हे बऱ्याच लोकांना माहिती नाही.

दीक्षाभूमीला सरकारने जागा द्यावी आणि पैसा द्यावा असे बौद्ध जनतेला वाटत होते. समाजाचे नियंत्रण राजकीय नेत्यांचे हाती होते. भारतीय रिपब्लिकन पक्षाचे नेते आणि पक्ष हेच आपले आधारस्तंभ आणि आश्रय स्थान आहे असे बौद्ध जनता समजत होती. त्यामुळे सरकारकडे जागेची मागणी रिपब्लिकन पुढाऱ्यांनीच केली. कर्मयोगी पद्मश्री दादासाहेब भाऊराव गायकवाड, बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे, अॅड. बी. सी. कांबळे, अॅड. बाबू हरिदास आवळे हे प्रमुख नेते होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या परिनिर्वाणानंतर याच नेत्यांचा शब्द प्रमाण असायचा. परंतु त्यांना राजकारण आणि समाजकारण यात अधिक रस होता. अन्याय-अत्याचार विरुद्ध लढणे हा त्यांचा पिंड होता. त्या काळानुसार तो चांगला गुण होता. त्यामुळे ते लोकांचा आधार होते. म्हणून ते राजकारणात लोकप्रिय होते. त्यामुळे त्यांच्या खांद्यावर समाजाची जबाबदारी होती. म्हणून दीक्षाभूमी, आरक्षण, अन्यायाविरुद्ध संघर्ष हे त्यांचे लोकप्रिय विषय होते. त्यामुळे त्यांनी दीक्षाभूमीकरीता जागेची मागणी सरकारकडे केली. त्यावेळी मोहन धारिया, यशवंतराव चव्हाण यांनी रिपब्लिकन पुढाऱ्यांना सहकार्य करण्यासाठी पर्याय उपलब्ध करुन दिला. धार्मिक कार्यात बांधकाम निधी आणि जमीन देता येत नाही. ही त्यांनी अडचण सांगितली होती. त्याचा पर्याय म्हणून राष्ट्रीय नेते म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राष्ट्रीय स्मारकाला जमीन आणि निधी पण देता येते. त्याचा उपयोग तुम्ही बौद्ध धर्माच्या प्रचार प्रसारा करीता करू शकता. हा पर्याय शेवटी निवडण्यात आला. दीक्षाभूमी करीता याप्रमाणे जमीन आणि निधी मिळाला आणि मिळत आहे. यामध्ये मात्र काही अडचणी निर्माण झाल्या.

राष्ट्रीय स्मारक असल्यामुळे त्यात काही बौद्धेतर लोकांना समितीचे कार्यकारी मंडळात सदस्य म्हणून घ्यावे लागते. म्हणून आंबेडकर कॉलेजमधील प्राध्यापक असलेल्या बौद्धेतर व्यक्तीला कार्यकारणी मध्ये घेतात. ते जर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे असतील तर मग अडचणीत भर पडते. दुसरी अडचण म्हणजे ही समिती धम्म प्रचारक नाही. त्यांचा पिंड धार्मिक नाही. त्यामुळे धम्म प्रचारक म्हणून जे सुचायला पाहिजे ते या लोकांना सुचत नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना मात्र हे अपेक्षित नव्हते. धम्मदीक्षा सोहळ्याची जबाबदारी डॉ. बाबासाहेबांनी रिप. नेत्यावर न देता वामनराव गोडबोले, मा. डो. पंचभाई यांच्यावर दिली होती. कारण ते धार्मिक होते. परंतु ते जमीन आणि निधी गोळा जुळवाजुळव करतील याची शाश्वती नव्हती. दादासाहेब रा. सु. गवई यांनी केलेल्या प्रयत्नांनी दीक्षाभूमी करीता निधी मिळविला. ते काम वामनराव गोडबोले यांना चिंचोली येथील बांधकामाकरीता आपल्या हयातीत करता आले नाही. कारण ते सत्तेत नव्हते. गवईसाहेब सत्तेत असल्यामुळे त्यांना ते शक्य झाले. ते चंद्रपूर दीक्षाभूमी करीता येथील संस्थेला करता आले नाही. सत्ते सोबत असल्याचा हा लाभ मिळाला. (असे असले तरी आंबेडकरी राजकीय चळवळ मागे आली.) ही बाब समजने आवश्यक आहे. ‘डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारक दीक्षाभूमी नागपूर’ असे नाव आहे. यात दीक्षाभूमी हा स्मारकाचा पत्ता आहे. परंतु आपल्या लोकांना तो पत्ता वाटत नाही. ती दीक्षाभूमी वाटते. हा मधला मार्ग काढल्याने दीक्षाभूमी बांधकाम झाले. पुढेही तो विकास होतच राहणार. पण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राष्ट्रीय स्मारक म्हणून. या अडचणी आपण सर्वांनी समजून घेतल्या पाहिजेत. तेव्हाच त्यातून मार्ग निघेल. समाजाने संयमाने काम घेतले पाहिजे. आपण संयम नाही ठेवला तर सरकार प्रशासक बसवतील. तेव्हा आपण आज जो आक्रमकपणा दाखवतो तो देखील दाखवू शकणार नाही. आज आपण समितीच्या पदाधिकाऱ्यांना काहीही बोलू शकतो. ते समाजाची भावना म्हणून अपमान सहन करतील. पण उद्या प्रशासक बसवला गेल्यास आपल्याला बुद्ध गये सारखा संघर्ष करावा लागेल. त्यात हाती काहीही लागणार नाही. म्हणाले दीक्षाभूमीचे पावित्र्य राखणे आपल्या सर्वांचेच कर्तव्य आहे.

दीक्षाभूमी आज तरी सरकारी नियंत्रणात आहे. त्याचा उत्तम पुरावा २०२६ या वर्षातील आंबेडकर जयंती निमित्ताने आयोजित निरंजन टकले यांचे व्याख्यान दीक्षाभूमीवर होऊ दिले नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीच्या अध्यक्षांनी दोन दिवस आधी परवानगी नाकारली.

**लेखांक169**



अशोक सरस्वती बोधी
मो. 8530980741

डॉ. चंद्रशेखर मेश्राम, डॉ. प्रदीप आगलावे हे दोन्ही समितीचे विश्वस्त जयंती उत्सव समितीचे पदाधिकारी होते. या सर्वांनी दोन्ही हात जोडून अध्यक्षांना विनवणी केली होती. तरी भंतेजी परवानगी देत नाहीत. याचा अर्थ सरकारचा किती दबाव असेल. पत्रकार निरंजन टकले हे बुद्धिप्रामाण्यवादी वक्ते आहेत. ते संघ भाजपला पचनी पडणारे नव्हते. हे त्याचे कारण होते. आज जे काही समितीत पराकोटीचे मतभेद आहेत. ज्यामुळे समाजाला दुःख होते. निदान इथे तरी हे तमाशे नको होते अशी लोक भावना आहे. बहुमताचा सर्वांनी मान करावा. पदासाठी धार्मिक संस्थेत भांडणे धम्म चळवळ कलंकित करणारे आहे. याचे सर्वांनी भान राखावे अशी लोक भावना आहे. समाजानी या मर्यादा समजून अपेक्षा ठेवणे आवश्यक आहे. अन्यथा आपण आपलाच अपेक्षाभंग करत राहू.●●

---

## !! रक्षा बंधन !!

आली श्रावणी पौर्णिमा, मैत्री करुणा ममतेची ,
बंधुभावाच्या धाग्यात, राखी बांधा समतेची.
न्याय हक्काचे रक्षण, ग्वाही मानवी मूल्यांची,
बंधुभावाच्या धाग्यात, राखी बांधा समतेची.

अंगुलीमाल झाला क्रूर, द्वेषाचे जहर पिऊन,
संविधानिक मूल्य पाजा, भिक्षु अहिंसक होऊन.
गरज नितांत बुद्धाच्या, अथांग करुणेची,
बंधुभावाच्या धाग्यात, राखी बांधा समतेची.

धम्म प्रचारी बांधण्या, महिलांना धम्मसूत्रां
महेंद्रासाठी लंकेला, धावून गेली संघमित्रा,
भाऊ बहिणीचे अमर नाते, नोंद झाली इतिहासाची,
बंधुभावाच्या धाग्यात, राखी बांधा समतेची.

तमाम महिलांनो करा, त्या महामानवाचे स्मरणं
प्रज्ञा करुणेची ओवाळणी, पाठी संविधानाचे रक्षणं,
मनचित्ती गाठ बांधा, मनगटी एकतेची,
बंधुभावाच्या धाग्यात, राखी बांधा समतेची.

-चित्तरंजन चौरे

## करा निसर्गाचे संवर्धन

कास धरावसुंधरा ची काम करा संवर्धना ची
सावली वृक्षाची, आमचे वर आहे माया माउली ची..१...

घाव घालू नका वृक्षा वर घाव, आमच्या
अस्तित्वावर जिवन होईल निष्फळ प्रश्न होईल
जगण्यावर...२..

नदी-तलावातील पाणी दर्शवीते जिवन कहानी..
रोखण्यासाठी आज पाणी रोपा ची व्हावी
लागवनी..३.

तोडाल जर आज झाडे वाळवंट उरेल तुमच्या
मुलांकडे जग होईल नंदनवन जर कराल,
निसर्गाचे संवर्धन..४..

- ईंजि. शुध्दोधन बडवणे





## काव्यफुले

संयोजक : प्रा. भीमराव गायकवाड
मो. 9822507225
बहुजन सौरभ

## चेताग्नी

प्रेतांनी आतातरी बोलावे
म्हणून मी बोलतोय!
निखारे हकनाक विझू नयेत
म्हणून मी लिहितोय!
ही स्मशानशांतता दूर व्हावी
म्हणून रस्त्यावर उतरलोय!
वाणीतला जयभीम
जगण्यात कायम राहील,
याची मी काळजी घेतोय!
अंधाराला हद्दपार करण्यासाठी
मुर्दाड मनात संविधानाचा चेताग्नी पेटवतोय!

- महेंद्रकुमार मेश्राम

## म्हणे ‘दिमागी नक्षल’ ?
## Gen-Z चा शांती संदेश



लढणे आमच्या - हे रक्तात आहे..
गुलामी सत्तेच्या - नरकात आहे..

काय त्या, लोकशाहीला निवडावे.?
घोळ, मत मुल्यांचे - त्या यंत्रात आहे..

संविधाना, तो - तुडवे पायदळी,
स्वातंत्र्य, तसे - मुठ भऱ्यात आहे.!

फोडूणं, झोडती - हे भेदी साऱ्यांना,
केली वाटणी - जाती धर्मात आहे..

झाल्या वांझ शाळा - भरे कुंभ मेळा.?
गांज्या फुके ते - व्यर्थ खर्चात आहे.!

भ्रष्ट सत्ता म्हणे -दिमागी नक्षल,
बेरोजी, फुटीच्या -'पे'परात आहे.?

कोणता भगवा - कोणता हिरवा.?
बंधुभाव, सारा - तिरंग्यात आहे..

मुजोर, सत्तेचा - तो हुकमी चेहरा,
आंदोलने, हे - पॅलेट गनात आहे.?

गुलामी, सत्तेच्या - नरकात आहे..
लढणे, आमच्या - हे रक्तात आहे..

-दिनकर रा मडकवाडे

## हे काय..?

अधर्माचा विजय होतो
धर्माची नेहमीच हार होते
गुणवान राहतात मागेच, मागे
पैसे वाला नेहमीच जिंकते

गुणाची किंमत झाली कमी
स्वाभिमान विकणारा जिंकतो
हा न्याय कसला आहे रे निसर्गा..?
असे कृत्य बघून जीव तुटतो

नुसते पैसेच सर्व काही आहे ...?
आज त्यालाच साथ दिली जाते
सत्याला किंमत उरली कुठे..?
तो तर अपमानीत जीवन जगते

तळमळून तरी काय फायदा..?
इथे सत्याची कोण हाक ऐकते...?
एकाच माळेचे मणी जमतात तेव्हा
सत्य मात्र पडद्याआड राहते

किती ही उंच उडी अन् धाव...?
हे नेमकं कशासाठी, कोणासाठी
पैज लागते विजय अन् जिंकणेच
शेवटी असतात का कोणी कोणासाठी..?

तो तरी काय करणार आता...?
सत्याशी वचनबध्द असते
दास बनून जगते शेवटपर्यंत
मात्र कोणाचा कधीच गुलाम नसते

- संगीता ढलाल

## स्वातंत्र्य ?



अमृत महोत्सव स्वातंत्र्याचा,
साजरा आम्ही करीतो
परी का? शेतकरी तो,
अजूनही आत्महत्या करीतो!!
घेऊनी तिरंगा हाती आम्ही,
स्वातंत्र्यदिनी मिरवित असतो
दुसऱ्या दिनी तोच तिरंगा,
कचऱ्यात का पडुन दिसतो
स्वच्छ भारत अभियान आम्ही,
जोर-जोमाने चालवित असतो
जाता कचेरीत वा रस्त्याने,
पिचकाऱ्या लाल मारीत असतो !
स्वातंत्र्याच्या, स्त्रीमुक्तीच्या,
बाता आम्ही बहू करितो,
तरी का? अब्रु स्त्रीची,
वेशीवर आम्ही टांगतो !
चालविण्या कारभार देशाचा,
लोकशाहीने नेता निवडून देतो
तोच नेता आम्हा भेटण्या,
उद्या-परवा करित असतो
बदलणार हे कधी सारे,
विचार हाच मनी असतो
घडून यावा बदल असला,
मनोमनी मी प्रार्थना करतो...

- चंद्रकांत सावळकर

## विद्रोहाचे पाणी

शरीरातील हृदय तट्ट फुगलेय,
विद्रोहाचे पाणी प्याल्यामुळे...
आजपर्यंत ज्याला आम्ही
आमचेच रक्त समजत होतो,
तेच मुळी हलाहल निघाले...!

ह्यांच्या रक्तात
वर्णभेद, गुलामगिरी, जातीयता...
यांचे अघोरी
श्वेत रक्तकण भिणलेले आहेत..
ह्यांचे रक्त रुढी, परंपरा...
अंधश्रद्धा... वासनामिश्रित आहे.
असह्य होताहेत हे अन्याय...
हा वासनाघात...!

गुलामगिरी... परंपरेचे...
शूल बोचताहेत काळजाला,
गुदमरताहोत ह्यांच्या अतिप्रसंगांनी...!

मन पोखरून निघाले सहस्त्र जखमांनी.
अत्याचाराच्या अॅसिडने
काळीज कसे करपून निघाले...!

पण...
तरीही ह्यांचे 'अघोरी वांझ रक्त'
आम्हाला नको आहे.
नको आहे आम्हाला ह्यांचे 'ब्लड डोनेशन'.
आज पर्यंत आम्ही
झूठ, नफरत, जुमलेबाजी
यांची दाहकता प्यालोत
मोकाट्याने...
पण आज...!
आज
काळजाच्या कोण्या एका कप्प्यात
क्रांतीबीज आक्रोश करीत आहे.
आज गरज आहे,
क्रांतीचे कॅक्टस उगवण्याची.
मनात क्रांतीकॅक्टस उगवायचा असेल,
तर...
प्यालेच पाहिजे...
प्यालेच पाहिजे विद्रोहाचे पाणी!

-इंजि. विजय चव्हाण

## कलयुगी रक्षाबंधन

वाटे रक्षण बंधन
कलयुगी कडू खरे
बंधू भगिणीचे नाते
बालपणी प्रिय बरे

नसे नात्यात ओलावा
दिसे फक्त व्यवहार
रक्षाबंधनाचा धागा
कच्चा होई पक्की हार

भ्राता ज्येष्ठ जिव्हाळ्याचा
बहिणींचा पाठीराखा
लग्न झालं नसे वेळ
ऐकू येईनात हाका

दिस जुने हरवले
सरलीय दादा माया
खेळ पैस्यांचा उरला
नसे प्रित बंधुराया

भातुकली खेळतांना
जात असे सासरला
डोळे पुसे भाऊ रडे
सिंधू कसा ओसरला

नको मज साडी चोळी
हवा धीर भाऊराया

तोडू नकोस माहेर
भासे थंड तुझी छाया

आईबाबा जाता भाऊ
ठेव एक घरी कप्पा
बालपणातले क्षण
भिंती करतील गप्पा

चल बनू पुन्हा सान
राखी बांधूनी हाताला
मिरवूया घरोघरी
जगू नव्याने नात्याला

- डॉ.शील बागडे

## पाणी तळ्यात होते...



पाणी तळ्यात होते,
बंधन पिण्यास होते
प्राषण कसे करावे,
अवगत भिमास होते
नव्हती मुभा तरीही,
मंदिर प्रवेश केला
तो प्रश्न अस्मितेचा,
ठाउक जनास होते
अज्ञान दूर होते,
शाळेत घातल्यावर
जाणिव दिली
मुलांना, उपकार खास होते

उत्थान शक्य आहे,
शरणागतास येथे
धम्मात सौख्य
शांती, कळले जगास होते
निर्वाण पाहताना,
मज गहिवरून आले
दु:खात चैत्यभूमी,
सल सागरास होते

- अरुण विघ्ने

## गझल



चळवळीचे भिमा, मोडले चाक रे
सांग मारू पुन्हा मी कुणा हाक रे !

ज्ञान घेऊन जे आज गेले पुढे,
खेकड्यांच्या वृत्तीने कापती नाक रे !

पक्ष फोडून गट आज झाले किती,
लागतो का कुणाला मग जरा धाक रे ?

पेरला द्वेष अन् ती विषमता इथे,
टाक जाळून तू, कर तिला खाक रे !

वळवळू लागले आज येथे किडे,
ना कुणाचा कुणाला राहिला धाक रे !

ठेव कायम तुझा तो दरारा इथे,
दुश्मनालाही कधी दे एकदा माफ रे !

राज्य करती बघा भ्रष्ट नेते खरे,
जनतेच्या हाती दे जागृतीची मशाल रे !

पूर्ण समजून घे, बुद्ध तू मानव,
त्याच बुद्धापुढे शेवटी वाक रे !

- सुभाष मानवटकर

30 August 2026 page 03-1_Layout 1 29-08-2026 07:29 PM Page 1



# अक्षर जोखीम

**युट्यूबच्या काळात पुस्तक प्रकाशित करणे ही फार मोठी जोखीम आहे. ही जोखीम लेखकानी स्विकारली पाहिजे. कारण युट्यूबवर माहिती करिता संदर्भ आणि पुरावे लागतात. खोटी माहिती फार टिकत नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या साहित्य, विचार, अनुभव आणि चळवळ संदर्भात वाचक फार जागरूक आहेत.**




ज्ञानाची भुक कायमस्वरूपी असते. नवे विचार, नवे प्रवाह हे परिवर्तनाची चाक असतात. हा काळाचा साखळीपट अत्यंत वेगाने फिरत आहे. मानवी संस्कृतीच्या पटावर विचारांची देवाणघेवाण करण्यासाठी जी माध्यमे निर्माण झाली, त्यात 'अक्षर' आणि 'पुस्तक' या घटकांनी शतकानुशतके एका छत्रासारखी मानवी बुद्धिमत्ता सांभाळून ठेवली. परंतु, एकविसाव्या शतकाच्या या उत्तरार्धात दृश्य-श्राव्य क्रांतीने विश्वाचे रूप पार बदलून टाकले आहे. आजचे जग एका 'क्लिक'वर फिरते आहे आणि मानवी लक्ष काही सेकंदांच्या व्हिडिओमध्ये बंदिस्त झाले आहे. अशा 'युट्यूब' आणि 'रील्स'च्या आक्रमक युगात कागदी पुस्तक प्रकाशित करणे, ते वाचकांपर्यंत पोहोचवणे आणि त्याला टिकवून ठेवणे ही खरोखरच एक मोठी आर्थिक, सांस्कृतिक आणि मानसिक 'जोखीम' बनली आहे का? हा प्रश्न आजच्या प्रत्येक लेखक, कवी आणि प्रकाशकाच्या मनात थैमान घालत आहे. वाचनाच्या संथ लयीचा अस्त हळुवारपणे होत आहे. पुस्तक वाचणे ही एक अंतर्मुख आणि संथ प्रक्रिया आहे. पुस्तकाचे पान उलटताना वाचकाला स्वतःच्या कल्पनाशक्तीचे आकाश उघडावे लागते. पुस्तकात लिहलेल्या ओळी वाचताना वाचकाचे मन स्वतःचे रंग भरते, पात्रांचे चेहरे रेखाटते आणि एका अथांग शांततेत स्वतःचा शोध घेते. वाचन ही 'सक्रिय' प्रक्रिया आहे. याच्या उलट, युट्यूब किंवा तत्सम व्हिडिओ माध्यमे ही सहज आणि त्वरित आनंद देणारी माध्यमे आहेत. तिथे रंग, रूप, आवाज, संगीत आणि चित्रे तयार मिळतात. त्यामुळे पुस्तकातील सखोल आशय समजून घेण्याऐवजी काही मिनिटांच्या समरी व्हिडिओकडे वळण्याचा कल वाढला आहे. जे डोळ्यांना दिसते आणि कानांना चटकन भुलवते, त्यालाच श्रेष्ठ मानण्याची प्रवृत्ती वाढत आहे. अशा काळात शब्दांच्या माध्यमातून वाचकाच्या मनाचा ताबा घेणे हे लेखकासमोरचे मोठे आव्हान आहे. पुस्तक प्रकाशनाचे आर्थिक गणितही कठीण झाले आहे. कागदाचे वाढलेले भाव, छपाई, बाइंडिंग, वितरण व्यवस्था आणि पुस्तक विक्रीची साधने यामुळे निर्मितीचा खर्च वाढला आहे. दुसरीकडे मोफत डिजिटल कंटेंट सहज उपलब्ध असल्यामुळे पुस्तक खरेदी करणारा वर्ग मर्यादित होत आहे. एखादे पुस्तक बाजारात यशस्वी झाले नाही, तर प्रकाशकाचे भांडवल अडकते आणि पुस्तक गोदामात पडून राहते. ही केवळ आर्थिक जोखीम नसून एका विचाराला समाजापर्यंत पोहोचविण्याची धडपडही आहे. युट्यूबच्या युगाने साहित्याला 'कंटेंट' आणि वाचकाला 'व्ह्यूअर' बनवले आहे. खळबळजनकता आणि त्वरित मनोरंजनाला महत्त्व मिळत असताना साहित्य संयम आणि चिंतनाची अपेक्षा करते. युट्यूबवरील एखादा व्हिडिओ काही तासांत लाखो लोकांपर्यंत पोहोचू शकतो; मात्र पुस्तकाला वाचकांच्या मनात स्थान मिळवण्यासाठी वेळ लागतो. त्यामुळे तात्कालिक लोकप्रियतेपेक्षा दीर्घकालीन विचारांची जपणूक करणारा लेखक पुस्तक प्रकाशित करण्याचे धैर्य दाखवतो, ते महत्त्वाचे आहे. युट्यूबवर मिळणारी माहिती ही अनेकदा माहितीपुरती राहते; ती ज्ञान आणि चिंतनाची जागा घेऊ शकत नाही. पुस्तके माणसाला विचार करायला शिकवतात. पुस्तकातून मिळणारा आनंद आणि विचारांची प्रक्रिया अधिक सखोल असते. आज माहितीचा संक्षिप्त डोस हवा असला तरी गंभीर वाचकाला पुस्तकाची गरज कायम आहे. तरीही या परिस्थितीत निराश होण्याचे कारण नाही. इतिहासाने दाखवून दिले आहे की नवीन तंत्रज्ञान आले म्हणून जुनी माध्यमे पूर्णपणे संपत नाहीत; ती आपले स्वरूप बदलतात. रेडिओ, दूरदर्शन आणि नंतर इंटरनेट आले, तरी वृत्तपत्रे आणि पुस्तके टिकून राहिली. त्याचप्रमाणे युट्यूबच्या काळात पुस्तक प्रकाशनानेही नव्या माध्यमांचा उपयोग करून घेतला पाहिजे. आज युट्यूबचा वापर पुस्तकाच्या विरोधात नव्हे, तर पुस्तकाच्या प्रसारासाठी करता येतो. लेखकांच्या मुलाखती, बुक टॉक्स, पुस्तक परीक्षणे, निवडक वाचन आणि ऑडिओबुक्स यांच्या माध्यमातून डिजिटल प्रेक्षकांना पुस्तकाकडे वळवता येते. पुस्तक आणि डिजिटल माध्यम यांचा संगम साहित्याला नव्या वाचकांपर्यंत घेऊन जाऊ शकतो. खरा गंभीर वाचक व्हिडिओ पाहून तृप्त होत नाही. त्याला पुस्तकाचा वास, पानांचा स्पर्श आणि शब्दांची सखोलता हवी असते. डिजिटल प्रकाशन, ई-बुक्स, किंडल आणि ऑडिओबुक्स यांसारखे पर्यायही पुस्तकाला नवे आयुष्य देत आहेत. त्यामुळे बदलत्या काळाशी जुळवून घेत पुस्तकाने आपले अस्तित्व अधिक व्यापक करणे आवश्यक आहे. युट्यूबच्या काळात पुस्तक प्रकाशित करणे ही निश्चितच आर्थिक आणि सांस्कृतिक जोखीम आहे. मात्र हीच जोखीम नवीन संधीही ठरू शकते. व्हिडिओचे तंत्रज्ञान बदलू शकते, फाईल कालबाह्य होऊ शकते; पण अक्षरांची ताकद टिकून राहते. हजारो वर्षांपूर्वी लिहिलेली अक्षरे आजही मानवाच्या विचारविश्वाला दिशा देतात. युट्यूब माणसाला बाहेरचे जग दाखवते, पण पुस्तक त्याला स्वतःच्या अंतर्मनाची सफर घडवते. म्हणून लेखकांनी नव्या माध्यमांची भीती न बाळगता त्यांचा उपयोग पुस्तकांच्या प्रसारासाठी केला पाहिजे. त्यामुळे, ही जोखीम पत्करणे हीच खरी साहित्याची सेवा आहे. पुस्तक प्रकाशन हे आव्हान कठीण नक्कीच आहे, पण या आव्हानातच साहित्याचे अमरत्व दडलेले आहे.●●



विलास गजभिये
मो. 9421588901

# निवडक अभंग व सोप्या शब्दांमध्ये अर्थ म्हणजे जनमानसातील तुकोबा

**लेखक, कवी, आदरणीय मिथुन ढिवरे, जळगाव यांचे नुकतेच “जनमानसातील तुकोबा भाग दोन” हे अथर्व प्रकाशन, जळगावच्या प्रकाशनात २५ जुलै २०२६ रोजी प्रकाशित झालेले पुस्तक, संत तुकाराम महाराजांच्या अभंगाचे संकलन असलेले संत साहित्य. एकूण ९६ पानांच्या या पुस्तकाचे मूल्य १७५ रुपये असून मुखपृष्ठ प्रथमदर्शनी लक्ष वेधून घेणारे आहे.**

एकाच प्रतिमेमध्ये बुद्ध व विठ्ठल यांची प्रतिकृती दर्शविणारे हे मुखपृष्ठ विठ्ठल भक्त व बुद्ध अनुयायी यांचे श्रद्धास्थान आणि सोबतच कीर्तन करणारे भक्त असा देखावा निर्माण करते. मलपृष्ठावर लेखकांचा फोटो असून भाग दोनमध्ये ६४ अभंगांचे संकलन करण्यात आले असल्याचे वाचकाला समजते. लेखकांनी हे पुस्तक संत तुकाराम महाराजांच्या शिष्या संत बहिणाबाई यांना अर्पण केले आहे. हरिभक्त परायण श्री. दीपक महाराज पाटील आपल्या प्रस्तावनेत तुकाराम महाराजांनी भोंदूगिरीवर कसा हल्ला चढविला हे अभंगांमधून स्पष्ट करतात. लेखक मिथुन ढिवरे आपल्या मनोगतात “जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराम महाराज आपल्या सर्वांमधूनच एक आहेत,” अशी सर्वसमावेशक भावना मांडतात. त्यामुळेच महाराजांचे अभंग प्रत्येकाला आपलेसे वाटतात. संत तुकाराम महाराज हे महाराष्ट्रातील महान संतकवी होते. त्यांच्या अभंगांमध्ये भक्ती, नामस्मरण, सदाचार, नम्रता आणि समाजप्रबोधनाचा संदेश आढळतो. संतसाहित्य हे त्रिकाल समाजाला दिशा देणारे आणि मार्गदर्शन करणारे समुपदेशात्मक साहित्य आहे. अशा असंख्य अभंगांमधून लेखकांनी निवडक अभंग संकलित करून त्यांचा सोप्या शब्दांत अर्थ उलगडून सांगण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे सर्वसामान्य वाचक, अगदी अक्षरओळख असलेला वाचकदेखील अभंगाचा मतितार्थ समजून घेऊ शकतो. पृष्ठ क्रमांक १३ वर असलेला पहिला अभंग जीवनातील कर्म आणि त्याच्या परिणामांची जाणीव करून देतो. चुकीच्या मार्गाने मिळविलेली कीर्ती शेवटी पश्चात्तापाचे कारण ठरते. संत तुकाराम महाराज नामस्मरण आणि चांगल्या आचरणातून जीवनाला योग्य दिशा देण्याचा संदेश देतात. *“रिकामें तूं नको मना । राहों क्षण-क्षणाही ।। वेळोवेळां पारायण । नारायण हें करीं ।।”* या अभंगातून मन कधीही रिकामे ठेवू नये, असा संदेश मिळतो. मन रिकामे राहिले की अनेक वाईट विचार, भ्रम आणि विकार त्यात प्रवेश करू शकतात. म्हणून सतत चांगल्या विचारात, नामस्मरणात आणि योग्य कार्यात मन गुंतवावे, असे तुकाराम महाराज सांगतात. आजच्या काळातही हा संदेश अत्यंत महत्त्वाचा आहे. पृष्ठ क्रमांक २० वरील अभंगातून मानवी जीवन क्षणभंगुर असल्याची जाणीव करून दिली आहे - *“क्षणक्षणा हाचि करावा विचार । तरवाया पार भवसिंधु ।।”* नाशिवंत शरीर आणि आयुष्य खात जाणारा काळ यांचा विचार करून माणसाने परमार्थाकडे वळावे, संतांचा सहवास धरावा आणि जीवनातील व्यवहार चांगल्या पद्धतीने करावा, असा या अभंगाचा आशय लेखकांनी सोप्या भाषेत स्पष्ट केला आहे. पृष्ठ क्रमांक ७३ वरील अभंगातून तुकाराम महाराजांनी भोंदू साधू आणि ढोंगी वैराग्यावर परखड प्रहार केला आहे, *“ऐसे कैसे झाले भोंदू । कर्म करोनि म्हणती साधू ।।अंगा लावूनियां राख । डोळे हुंपुनि करिती पाप ।।”* बाह्यरूपाने साधूपणाचा आव आणणारे, परंतु प्रत्यक्ष जीवनात पापकर्म आणि विषयभोग करणारे लोक समाजाला फसवतात. अशा दांभिक व्यक्तींची संगत टाळावी, हा स्पष्ट संदेश या अभंगातून मिळतो. धर्माचा बाह्य देखावा आणि प्रत्यक्ष आचरण यातील विरोधाभासावर तुकाराम महाराजांनी जवळपास चारशे वर्षांपूर्वीच केलेली ही टीका आजही तितकीच लागू पडते. पुस्तकातील **“एक ब्रह्मचारी गाढवा झोंबतां...”** हा अभंग तुकाराम महाराजांच्या उपरोधिक आणि विनोदी शैलीचे उदाहरण आहे. एका चुकीमुळे किंवा वाईट कृतीमुळे व्यक्तीची प्रतिष्ठा कशी धुळीस मिळू शकते, हे या अभंगातून सांगितले आहे. विनोदाच्या माध्यमातून त्यांनी दांभिकपणा आणि बाह्य दिखाव्यावर मार्मिक भाष्य केले आहे. “जनमानसातील तुकोबा” या पुस्तकाचे आणखी एक विशेष म्हणजे लेखकांनी अभंगाचे अर्थ समजावण्यासाठी वापरलेली सोपी भाषा शैली. त्यामुळे अभंगातील अवघड आशयही सहज समजतो. आजच्या पिढीला संत तुकाराम महाराजांचे विचार समजावून देण्यासाठी हे पुस्तक निश्चितच उपयुक्त ठरते. आजच्या पिढीला ही मार्गदर्शक ठरावे असे हे उपयुक्त लेखन लेखकांनी उपलब्ध करून समाज प्रबोधनाचे कार्य केले आहे. यासाठी मी लेखकांचे हार्दिक अभिनंदन करते व जनमाणसातील तुकोबा भाग एक आणि भाग दोन हे दोन्ही पुस्तके वाचकांच्या पसंतीस उतरलेल अशी मंगल कामना करून लेखकांच्या पुढील साहित्यिक वाटचालीस अनेक शुभेच्छा देते.●●






अस्मिता मेश्राम
भंडारा,
9921096867

***पुस्तक - जनमाणसांतील तुकोबा भाग -२***
***लेखक - मिथुन ढिवरे, मूल्य - १७५/- रू***

# बहिणाबाई चौधरी यांच्या कवितेत जीवनाचे तत्त्वज्ञान




त्या म्हणजे गाडगेबाबा आणि बहिणाबाई चौधरी. गाडगेबाबा यांच्या नावाने अमरावती येथे विद्यापीठ आहे तर बहिणाबाई चौधरी यांच्या नावे जळगाव येथे विद्यापीठ आहे. कित्येक विद्यालयात आणि महाविद्यालयाच्या पाठ्यक्रमात बहिणाबाई यांच्या कविता शिकविल्या जातात आणि त्यांच्या साहित्यावर कित्येकांनी Ph.D. मिळविल्या आहेत. आज बहिणाबाई चौधरी यांची जयंती आहे. बहिणाबाई चौधरी (२४ ऑगस्ट १८८० - ३ डिसेंबर १९५१) या महाराष्ट्रातील एक अत्यंत लोकप्रिय आणि प्रेरणादायी मराठी कवयित्री होत्या. अहिराणी भाषेतून त्यांनी लिहिलेल्या सहज, सुंदर आणि जीवनविषयक तत्त्वज्ञान सांगणाऱ्या कविता मराठी साहित्याचा अमूल्य ठेवा मानल्या जातात. जन्म आणि बालपण बहिणाबाईंचा जन्म जळगाव जिल्ह्यातील असोदे या गावी झाला. त्यांच्या आईचे नाव भिमाई आणि वडिलांचे नाव उखाजी महाजन होते. त्यांचे कुटुंब शेतकरी होते. ग्रामीण जीवन, शेती, निसर्ग आणि कष्ट यांचा त्यांच्या मनावर बालपणापासूनच खोल परिणाम झाला. विवाह आणि जीवन वयाच्या अवघ्या १३ व्या वर्षी त्यांचा विवाह नथुजी चौधरी यांच्याशी झाला. लग्नानंतर त्या सासरी नांदायला आल्या. त्यांचे संपूर्ण आयुष्य शेती, कष्ट आणि संसारात गेले. त्यांचे पती लवकर निवर्तल्याने त्यांनी खडतर परिस्थितीतून कुटुंबाचा गाडा सांभाळला. त्यांना तीन मुले झाली. वयाच्या ३० व्या वर्षी त्या विधवा झाल्या. त्यांच्या तीन मुलांपैकी सोपानदेव चौधरी हे पुढे सुप्रसिद्ध कवी झाले. अशिक्षित असूनही अजरामर काव्य बहिणाबाई स्वतः निरक्षर होत्या. मात्र त्यांची निरीक्षणक्षमता आणि आकलनशक्ती अफाट होती. त्या घरात किंवा शेतात काम करताना सहजपणे गुणगुणायच्या. आयुष्यभर शेतात काम करताकरता त्यांनी कविता रचल्या. त्यांचे सुपुत्र सोपानदेव चौधरी यांनी त्यांच्या मुखातून बाहेर पडलेल्या या कविता कागदावर उतरवून जपल्या. सोपानदेव सांगतात की, आई दिवसभर शेतात काम करायची आणि काम करता करता तिला कविता सुचत असत. संध्याकाळी सर्वांची जेवणे झाली की ती त्यांना कविता सांगायची आणि सोपानदेव त्या कागदावर लिहून ठेवायचे. तो कागद बहिणाबाई आपल्या कमरेला असलेल्या चंचीत ठेवत. चंची कागदांनी भरली की घरातील आढ्यावर, म्हणजे छप्पर धरून ठेवणाऱ्या आडव्या लाकडावर, ती खोचून ठेवली जायची. एकदा घराच्या आणि शेतीच्या वाटण्या होणार असल्याने सोपानदेव मुंबईहून गावी आले. पंचमंडळी घराबाहेर बसली होती. घरातील वस्तू वाटण्यासाठी बाहेर काढल्या जात होत्या. त्यात एक चंची निघाली. सोपानदेवांनी ती चंची स्वतःकडे मागितली. पंचांना वाटले की त्यात सोने असेल; मात्र त्यातून जीर्ण झालेले कागद निघाले. तेच बहिणाबाईंच्या कविता होत्या. सोपानदेव ती चंची घेऊन मुंबईला आले. त्यांनी त्या कविता एका वहीत लिहून ठेवल्या. त्या नेहमी त्यांच्या शबनम पिशवीत असत. एकदा ते आचार्य अत्रे यांच्याकडे गेले असता शबनम पिशवी तिथेच राहिली. ती घेण्यासाठी परत आले असता अत्रे त्या कविता वाचत होते. त्या कविता वाचून अत्रे यांनी बहिणाबाईंच्या प्रतिभेचे महत्त्व ओळखले. त्यांनी दैनिक ‘मराठा’मध्ये बहिणाबाईंच्या कवितांवर दोन अग्रलेख लिहिले आणि त्यांच्या कविता प्रसिद्ध केल्या. काव्याचे स्वरूप आणि भाषा बहिणाबाईंच्या कवितांची भाषा अहिराणी आणि खानदेशी मराठी आहे. त्यांच्या काव्यात शेती, निसर्ग, पशुपक्षी, मानवी भावना आणि संसारातील सुख-दुःख यांचा प्रामुख्याने समावेश आहे. “आला सास, गेला सास, जीवा तुझं रे तंतर, अरे जगनं-मरनं एका सासाचं अंतर!” या ओळी मानवी जीवनाचे मर्म अगदी सोप्या शब्दांत सांगतात. त्यांच्या अनेक कविता आज लोकांच्या तोंडपाठ आहेत, “अरे संसार संसार / जसा तवा चुल्ह्यावर / आधी हाताला चटके तेव्हा मिळते भाकर.” “मन वढाळ, वढाळ / उभ्या पिकातलं ढोर / किती हाकला हाकला / फिरून येते पिकावर.” “मन मोकाट मोकाट / याच्या ठाई ठाई वाटा / जश्या वाऱ्याने चालल्या / पाण्यावरच्या रे लाटा.” बहिणाबाईंच्या कवितेत जीवनाचे तत्त्वज्ञान अत्यंत साध्या ग्रामीण प्रतिमांमधून व्यक्त होते. “माझी माय सरस्वती, मला शिकविते बोली / एका बहिणीच्या मनी, किती गुपिते पेरली” असे त्या म्हणतात. “घरोटा घरोटा, तुझ्यातून पडे पिठी / तसे तसे माझे गाणे, पोटातून येते ओठी” या ओळी त्यांच्या कवितेचा जन्म कसा होत असे हे सांगतात. बहिणाबाईंना माहेरचे खूप प्रेम होते. एकदा एका योगीने त्यांना विचारले, “माझे माहेर माहेर, सदा गाणे तुझ्या ओठीमग माहेरून आले, मग सासरी कशापोटी?” त्यावर बहिणाबाई म्हणतात, “अरे ऐक हे रे योग्या, ऐक काय मी सांगते / लेकीच्या माहेरासाठी माय सासरी नांदते.” बहिणाबाईंच्या काही कमी प्रसिद्ध कविता देखील त्यांच्या जीवनदृष्टीची सखोलता दाखवतात. “बिना कपाशीने उले त्याले बोड म्हणू नई / हरिनामाविना बोले त्याले तोंड म्हणू नई” अशा ओळींमधून त्या जीवनातील मूल्यांची कसोटी सांगतात. तसेच शेतीच्या जीवनाशी असलेले त्यांचे नाते “धरित्रीच्या कुशीमध्ये बियबियाणी निजली / वर पसरली माती जशी शाल पांघरली” या कवितेतून दिसते. बीज, कोंब, पान, पिकाचा बहर आणि वाऱ्यावर डोलणारे दाणे यांचे त्यांनी केलेले वर्णन म्हणजे ग्रामीण जीवनाचे जिवंत चित्रच आहे. “देव अजब गारुडी, देव अजब गारुडी.” निधनानंतर १९५२ साली ‘बहिणाबाईंची गाणी’ हा त्यांचा कवितासंग्रह प्रकाशित झाला. आचार्य अत्रे यांनी या पुस्तकाचे सुंदर प्रास्ताविक लिहिले होते. माधुरी शानभाग यांनी ‘फ्रॅग्रन्स ऑफ द अर्थ’ या नावाने बहिणाबाई चौधरी यांच्या कविता इंग्रजीमध्ये भाषांतरित केल्या आहेत. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठानेही ‘बहिणाबाईंची गाणी’ हा आपल्या अभ्यासक्रमाचा भाग केला आहे “वारसा आणि सन्मान”. ३ डिसेंबर १९५१ रोजी जळगाव येथे त्यांचे निधन झाले. त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ जळगाव येथील उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाला (कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ) त्यांचे नाव देऊन गौरवण्यात आले आहे.●●

> **जे कधीही प्राथमिक शाळेत सुद्धा गेले नाहीत, साधी अक्षरओळख सुद्धा नाही, पण ज्यांच्या नावाने विद्यापीठ आहे अशा दोन महान विभूती महाराष्ट्रात होऊन गेल्या.**



डॉ. सुनिल भगत
मो. 94230 64391

# पठारावरच्या कविता : धगधगते जीवन वास्तव

**महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कार्ल मार्क्स यांच्या विचारांचा वारसा घेऊन लेखन करणारे परिवर्तनवादी विचारांचे कवी लेखक वासुदेव डहाके सामाजिक व वाङ्मयीन चळवळीतील एक महत्त्वाचे नाव आहे.**

स्वातंत्र्य, समता, लोकशाही या मूल्यांना आत्मसात करीत मानव मुक्तीसाठी धडपडणाऱ्या सामाजिक बांधिलकीचे व्रत घेतलेल्या समूहाचा ते प्रतिनिधी आहेत. प्रबोधनवादी विचार अंगी भिनलेल्या वासुदेव डहाके या व्यक्तित्वाचे साहित्यही त्याच विचारांचे वाहक आहे. तांडव, परिवर्तनाची बीजाक्षरे, सावित्रीच्या पोरी, प्रबोधनाचे पडसाद, शंकरराव खरात यांची साहित्य सृष्टी, ओस झाल्या दिशा, गिऱ्हान, पठारावरच्या कविता, कॉम्रेड अशा नऊ साहित्यकृतींची त्यांनी निर्मिती केली असून 'पठारावरच्या कविता' हा त्यांचा पहिला कवितासंग्रह आहे. वासुदेव डहाके विद्यार्थीदशेपासून कविता लिहीत असले तरी 'पठारावरच्या कविता' हा त्यांचा कवितासंग्रह बऱ्याच उशिरा, बहुदा नोकरीतून निवृत्त झाल्यावर आलेला आहे. कवी ऐन उमेदीतल्या दिवसात, जवळपास दोन तपे विमुक्त, भटक्या जमातीच्या चळवळीत राबले. त्यांच्या उत्थानासाठी तन-मन-धनाने झटले. महाराष्ट्रभर हिंडून विमुक्त वस्त्या पाहिल्या व त्यांचे प्रश्न सरकार दरबारी मांडण्याचे प्रयत्न केले. त्यांच्या न्याय्य हक्कांसाठीच्या मोर्चांत सहभागी झाले. भटक्या-विमुक्त मुलांसाठी शाळा, वसतिगृहे स्थापन व्हावीत म्हणून प्रयत्न केले. लेखणी आणि भाषणातून प्रश्न मांडण्यासोबतच प्रबोधनाचे काम केले. या कार्याचा आणि प्रत्यक्ष अनुभवांचा परिपाक म्हणजे ‘पठारावरच्या कविता’ हा कवितासंग्रह होय. विमुक्त-भटक्यांचे जीवन आजही अत्यंत खडतर आहे. तीन दगडांची चूल, वारा-वादळाशी संघर्ष करणारे पाल, भीक्षा हे उदरनिर्वाहाचे साधन, जन्मजात दारिद्र्य, चिखल-अंधाराशी संघर्ष आणि पाठीवर संसार घेऊन चाललेली सततची भटकंती, या भीषण वास्तवाचे चित्रण डहाके यांनी केले आहे. जातिव्यवस्थेमुळे एका समाजघटकाच्या वाट्याला आलेले भयावह जगणे त्यांच्या कवितेत प्रखरतेने व्यक्त होते. ‘काळोख’ कवितेत “वनवासी जीवित माझे धडधडत्या सरणावरती” अशी वेदना व्यक्त होते. तर ‘माझ्या जल्माची कविता’मध्ये उघड्या पठारावर पालात झालेला जन्म, आक्रंदणारा बाप, संघर्ष करणारी आई आणि दारिद्र्याचे जगणे यांचे अत्यंत अस्वस्थ करणारे चित्र उभे राहते. ही केवळ एका व्यक्तीची कथा नसून संपूर्ण विमुक्त-भटक्या समाजाचे सार्वत्रिक वास्तव आहे. मात्र या कवितेत केवळ दुःख नाही, तर संघर्षाची ज्वालाही आहे. “पावलांच्या स्फुल्लिंगांनी उभे पठार पेटून उठेल, असे संघर्षरत व्हा दोस्तांनो!” हा आवाहनात्मक स्वर त्याचे प्रतिक आहे. अन्याय, उपेक्षा आणि भणंग जगण्याविरुद्ध कवीचे मन बंड करून उठते. दलित चळवळीतील विद्रोहाचे बाळकडू आणि सामाजिक चळवळीतील अनुभव यामुळे त्यांच्या कवितेला सामाजिक बांधिलकीची धार प्राप्त झाली आहे. ‘मी’ आणि ‘गुन्हेगार’ या कवितांत कवीचा स्वाभिमान आणि परिवर्तनवादी भूमिका ठळकपणे दिसते. “ना दिला खांदा कुणाच्या पालखी अन तिरडीला, ना कुणाचा दास झालो” या ओळींतून तडजोड नाकारणारा स्वभाव व्यक्त होतो. अंधारातून प्रकाशाकडे जाण्याची आणि अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची ताकद त्यांच्या कवितेत आहे. एकलव्याच्या खुडलेल्या अंगठ्याला सहस्र पारंब्या फुटल्याची प्रतिमा परिवर्तनाच्या सामर्थ्याची जाणीव करून देते. या संग्रहात आशावादालाही महत्त्वाचे स्थान आहे. ‘जीवनाची गोठी’मध्ये शिक्षणामुळे पठारावरील जीवनात आलेले चैतन्य व्यक्त होते. “पठारावरचा उदास उसासा, दिधला दिलासा शिक्षणाने” या ओळी परिवर्तनाची दिशा दाखवतात. ‘बरे झाले’मध्ये आंबेडकरी विचारांची ज्योत पेटल्याचा आशावादी सूर आहे. दुःख सहन करूनही त्यातून प्रकाश निर्माण करण्याची वृत्ती या कवितांमध्ये दिसते. सृजनप्रक्रियेतील वेदना आणि आनंदही कवीने समर्थपणे व्यक्त केला आहे. ‘गरुड’, ‘क्षण’ आणि ‘बाई मी गर्भिणी वनिता’ या कवितांमधून सृजनापूर्वीची तगमग, वेदना आणि त्यानंतरची धन्यता जाणवते. “फुलोनिया आल्या सर्वांगीच्या कळा, वेदनेचा मळा धन्य झाला” या ओळीत सृजनानंदाचे सुंदर दर्शन घडते.या संग्रहातील प्रेमकवितांनाही सामाजिक बांधिलकीची जोड आहे. वैयक्तिक शृंगारापेक्षा परिवर्तनाच्या वाटेवर साथ देणारे प्रेम येथे महत्त्वाचे आहे. बुद्धाच्या स्मितासारखे प्रेमाचे फुल फुलावे, अंधारलेल्या वाटांना उजेड मिळावा, समाजपरिवर्तनाच्या यात्रेला बळ मिळावे, असा या प्रेमाचा व्यापक अर्थ आहे. ‘पठारावरच्या कविता’मध्ये स्त्रीची विविध रूपेही प्रभावीपणे आली आहेत. ‘आई’, ‘मा दीक्षाभूमी’, ‘सूर्य म्हणाला पणतीला’ आणि विशेषतः ‘पोरींनो’ या कवितांमधून स्त्रीची शक्ती, संघर्षशीलता आणि कर्तृत्व अधोरेखित होते. सावित्रीचे संजीवन आणि जोतीबांची ज्योत घेऊन पुढे जाणाऱ्या मुलींची प्रतिमा अत्यंत सशक्त आहे. संग्रहातील काही कविता मुक्तछंदातील, काही गेयस्वरूपाच्या असून अष्टाक्षरी रचनाही कवीने सहजतेने हाताळली आहे. मुक्तछंदातही लय, सूचकता आणि काव्यात्मता आहे. वास्तव मांडतानाही कलात्मक मर्यादा सांभाळल्यामुळे या कविता चिंतनशील, परिणामकारक आणि लक्षवेधी ठरतात. कविता ही हृदयातून आलेली हाक असते. कवीच्या वैयक्तिक अनुभवांचे, तो जगतो त्या अनुभवांचे पडसाद कवितेत उमटत असतात. कवीची आकांक्षा, ध्येयनिष्ठा, आलेले प्रतिकूल जीवनानुभव, नैराश्यातून पेटून उठण्याची उर्मी कवीने अनेक कवितांमधून अतिशय सुचकतेने प्रतिमा, प्रतिकांच्या उपयोजनातून प्रभावीतेने मांडली आहे. काव्यप्रांतातील वावर, अभ्यासातून आलेली परिपक्वता, परिस्थितीतून ताऊन सूलाखून निघालेले जगणे, चळवळीतले अनुभव, समाजाप्रतीचा आस्थाभाव, संवेदनशील सजग मन या सर्वांच्या परिपाकातून वासुदेव डहाके यांची कविता आकारास आली. मनातील चीड व्यक्त करतानाही तिच्यात आक्रमकता येत नाही वा तिने कुठेही कलात्म मर्यादांचे उल्लंघन केलेले नाही. ही कविता अंतर्मुख करणारी समंजस, परिपक्व, भावनांची शुद्धी करणारी आहे. कवी वासुदेव डहाके यांच्या काव्य प्रवासाला माझ्या मनःपूर्वक शुभेच्छा.●●




प्रा. मीनल येवले
मो. 7774003877

# सामाजिक बांधिलकीची सर्जनशील निर्मिती...

**नाशिकचे ज्येष्ठ साहित्यिक प्राध्यापक डॉ. यशवंतराव शंकरराव पाटील उर्फ शंकरसुत यांच्या 'माझ्या ऱ्हस्व अन् दीर्घ कविता' हा अत्यंत आकर्षक आणि समृद्ध शब्दकळा असलेला काव्यसंग्रह मला समीक्षणाकरिता पाटील सरांनी भेट म्हणून पाठविला व यावर समीक्षण लिहावे अशी विनंती केली. हा मला त्यांनी दिलेला सन्मानच आहे.**

सोबत एक चारोळी संग्रह सुद्धा पाठविलेला आहे. अशा दातृत्व गुण असलेल्या महान व्यक्तीने मला समीक्षा लिहिण्याची संधी दिली हे माझे अहोभाग्य! ज्ञानपथ पब्लिकेशनने प्रकाशित केलेल्या या काव्यसंग्रहाचे मुद्रक श्री गुरुदेव प्रिंटर्स, अमरावती आहेत. डॉ. प्रशांत दामोदर भरवीरकर उर्फ 'सुशीला नंदन' तसेच डॉ. नरसिंग कदम यांची प्रस्तावना लाभली आहे. नागपूरचे प्रभाकर तांडेकर 'प्रदत्त' यांनी उत्स्फूर्त पाठराखण केली आहे. १८० पानांचा हा संग्रह वाचनीय असून प्रथम भागात ७६ ऱ्हस्व कविता आणि दुसऱ्या भागात २४ दीर्घ कविता आहेत. संग्रहाचे मुखपृष्ठही बोलके आहे. आठवणींच्या सुखद काळासाठी सोनेरी-केशरी रंग आणि जीवनातील दुःखद प्रसंगांसाठी करडा रंग वापरून जीवनातील सुख-दुःखाचे दोन्ही रंग प्रभावीपणे दाखविले आहेत. समाजातील राजकीय संघर्ष, नात्यांमधील कोरडेपणा, राजकारणातील खोटेपणा, भ्रष्टाचार, नैतिकतेचा ऱ्हास आणि मूल्यांची पायमल्ली या विषयांवर कवीने वास्तववादी कविता लिहिल्या आहेत. 'मृत्यू म्हणजे काय असतो', 'निंदा आणि स्तुती', 'काय पूजावे?' अशा कवितांतून मानवी जीवनाचे गहन तत्त्वज्ञान आणि शब्दांचे मृदू स्पर्श जाणवतात. 'उघडा डोळे, ओळखा धोका' या कवितेतून वर्तमानातील अस्वस्थ करणाऱ्या परिस्थितीचे भान जागे होते. कवीची भाषा प्रवाही, ओघवती आणि सहजसुंदर आहे. कुठेही कृत्रिमता जाणवत नाही. 'दोन टोकांच्या घटना' या दीर्घ कवितेत आनंद-दुःख, श्रीमंती-गरिबी अशा जीवनातील विरोधाभासांचे चित्रण आहे. 'भ्रष्टाचाराचे रेणू तथा डीएनए आढळतात बहुतेकांच्या रक्तात' या ओळीतून भ्रष्ट व्यवस्थेवर कवीने केलेले भाष्य अस्वस्थ करून जाते. 'घर देता का घर' हा प्रश्न गरिबांच्या जगण्यातील मूलभूत समस्या अधोरेखित करतो. पेपरफुटीच्या प्रश्नावर लिहिलेली कविता तर आजच्या विद्यार्थ्यांच्या आणि पालकांच्या वेदनेला थेट आवाज देते. विद्यार्थी दहा-बारा तास अभ्यास करूनही पेपरफुटीमुळे त्यांचे भविष्य धोक्यात येते, पालकांचा पैसा आणि कष्ट वाया जातात, याचे दुःख कवी व्यक्त करतो. 'रामराज्य' या संग्रहातील पहिल्याच कवितेत कवीची राजकीय संवेदनशीलता दिसते. 'बरे झाले रामा, नाही दिले पाशवी वा हुकूमी बहुमत...' या आशयातून सत्तेच्या केंद्रीकरणाबद्दलची चिंता व्यक्त होते. 'प्रदूषण' कवितेत केवळ हवा, पाणी आणि निसर्गाचेच नव्हे, तर माणसांच्या विचारांचे आणि वर्तनाचेही प्रदूषण झाले असल्याचे कवी सांगतो. चंगळवाद, हाव आणि भोगवादामुळे निसर्ग व सामाजिक वातावरण दोन्ही प्रदूषित होत असल्याचे ते अधोरेखित करतात. 'प्रिय तिरंगा' या कवितेतून भारतीय सेनेचा अभिमान आणि देशप्रेम व्यक्त झाले आहे. तिरंग्याच्या माध्यमातून एकजूट, राष्ट्रीय भावना आणि देशाचे उज्ज्वल भविष्य घडविण्याचा संदेश कवी देतो. राम आणि रावण यांच्या प्रतिकांतूनही त्यांनी सुंदर संदेश दिला आहे. सद्गुणी, सत्कर्मी व्यक्तीत राम पाहावा, तर काम, क्रोध, लोभ, मोह, मत्सर यांसारख्या विकारांत रावण ओळखावा, असा विचार या कवितेत आहे. 'अक्षय तृतीया', 'पितृपक्ष पंधरवडा', 'गुढीपाडवा' अशा कवितांतून परंपरा, संस्कृती आणि पूर्वजांविषयीची कृतज्ञता व्यक्त झाली आहे. मात्र केवळ पूजा-अर्चा किंवा दिखावा न करता पूर्वजांच्या स्मृती कृतीतून जपल्या पाहिजेत, असा मौलिक संदेशही कवी देतात. मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्यानंतर मराठी भाषिकांनी तिच्या संवर्धनाची जबाबदारी स्वीकारावी, असेही ते सांगतात. आजच्या परिस्थितीतील निवडणुका, लोकशाहीचे जतन, मतदानाचे महत्त्व, मतदारांचे कर्तव्य, संविधान, भ्रष्टाचार अशा ज्वलंत विषयांवरही कवीने लेखणी चालवली आहे. महात्मा गांधी, अटलजी, जिजाऊ, महाकवी कालिदास, स्वामी विवेकानंद अशा थोर व्यक्तींना त्यांनी कवितेतून मानवंदना दिली आहे. 'संविधान' या कवितेत स्वातंत्र्य, समता, ममता आणि बंधुत्वाची ज्योत पुन्हा पेटविण्याचे आवाहन आहे. अभिव्यक्ती स्वातंत्र्याची गळचेपी आणि सत्तेसाठी साम-दाम-दंड-भेदाचा वापर यावरही त्यांनी भाष्य केले आहे. अध्यात्म, भक्ती, वारी, रामलल्ला, श्री स्वामी समर्थ, गुढीपाडवा अशा विषयांनाही कवीने स्पर्श केला आहे. त्याचबरोबर शेतकऱ्यांचे प्रश्न आणि त्यांच्या जीवनातील संघर्षांचेही भान त्यांनी ठेवले आहे. 'बहिणीचं चांगभलं' या कवितेत लाडकी बहीण योजनेच्या राजकीय आणि आर्थिक परिणामांवर भाष्य केले आहे. 'उपभोगशून्य स्वामी'मध्ये रतन टाटा यांच्या कार्याचा गौरव, तर 'गुरुमहात्म्य'मध्ये गुरुकृपेचे महत्त्व व्यक्त केले आहे. 'अहंकार' या दीर्घ कवितेत गर्व, ताठा आणि राग टाळण्याचा संदेश आहे. कवीच्या अंतर्मनातून अवतरत गेलेल्या भावभावना, कल्पनांची गगन भरारी सारे काही शब्दाने, मनाच्या सृजन सोहळ्याचे सुंदर चित्रण म्हणजे हा कवितासंग्रह! अप्रतिम लावण्य व वास्तव यांचा मिलाप कवीने आपल्या प्रस्तुत कवितासंग्रहात साधलेला आहे. आपले संसारिक जीवन जगत असताना चिंतन करण्याची सवय लावल्याने पाटील सरांच्या सर्व कवितांना अनुभूतीचे कोंदण लाभलेले आहे. भावभावनांचा सुरेख मेळ साधणारा हा कवितासंग्रह निश्चितच वाचक प्रिय ठरेल. त्यांच्या पुढील साहित्यिक वाटचालीसाठी माझ्या मनापासून खूप खूप हार्दिक शुभेच्छा. ऱ्हस्व दीर्घ कविता लिहिताना करावी सकारात्मक विचारांची पेरणी वृद्धिंगत व्हावी. डॉ पाटील सरांची चिंतनात्मक लेखणी 'कवीची सर्व क्षेत्रातील घोडदौड अशीच अबाधित राहो. मानवतेच्या हिताचे कार्य सतत त्यांच्याकडून घडत राहो अशा लक्षावधी शुभेच्छा.●●






प्रणोती कळमकर
मो. 9834209457

# कॉक्रोच जनता पार्टीची नाशिक जिल्हा बैठकीत संघटनात्मक बांधणीवर सविस्तर चर्चा



**नाशिक :** कॉक्रोच जनता पार्टीच्या महाराष्ट्र दौऱ्याअंतर्गत नाशिक जिल्हा बैठक शासकीय विश्रामगृहाच्या गार्डनमध्ये पार पडली. बैठकीत पक्षाच्या आगामी कार्यक्रमांसह संघटनात्मक बांधणीवर सविस्तर चर्चा केली. बैठकीत 'स्कूल ठीक करो' अभियानांतर्गत सरकारी शाळांचे ऑडिट कशा पद्धतीने करावे, सीजेपीच्या विविध आंदोलनांबाबत जनतेच्या प्रतिक्रिया आणि जिल्ह्यात पक्षाची संघटनात्मक ताकद वाढविणे या प्रमुख विषयांवर चर्चा झाली. सरकारी शाळांमधील उपलब्ध सुविधा, विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या सोयी-सुविधा आणि शैक्षणिक व्यवस्थेचा आढावा घेण्यासाठी ऑडिट अभियान प्रभावीपणे राबविण्याबाबत कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. यावेळी पक्षाचे ऑर्गनायझेशन जॉइंट सेक्रेटरी अक्षय शिंदे, वेस्ट झोन कोऑर्डिनेटर ॲड. जयसिंग शेरे, डॉ. नितीन दिघे, सम्राट सोनावणे, क्षितिज पगार, प्रज्वल कसबे, प्रवीण गांगुर्डे, सागर स्वामी, धवल, ॲड. अभिजित गोसावी, ॲड. रेखा धुळधुळे, तेजल गवारे, कार्तिकेश बोरसे तसेच माजी सनदी अधिकारी बी. जी. वाघ यांच्यासह नाशिक जिल्ह्यातील पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. बैठकीत नाशिक जिल्ह्यात पक्षाचे संघटन अधिक मजबूत करण्याबरोबरच स्थानिक प्रश्नांवर सक्रियपणे भूमिका घेण्याचा निर्धार केला. आगामी काळात जिल्ह्यात पक्षाच्या विविध उपक्रमांना अधिक व्यापक स्वरूप देऊन जनसामान्यांपर्यंत पोहोचण्याचे नियोजन केल्याचे पक्षाच्यावतीने सांगितले.

# दु:खमुक्तीसाठी शीलपालन आवश्यक : श्याम तागडे



**नागपूर :** रमाई बुद्ध विहार, रमाईवाडी, श्रीनगर, नागपूर येथे नारळी पौर्णिमेनिमित्त आयोजित कार्यक्रमात सेवानिवृत्त सनदी अधिकारी श्याम तागडे, माजी अपर मुख्य सचिव (गृह), महाराष्ट्र शासन यांनी 'बुद्ध धम्म व गृहस्थ जीवनाचा कुशल मार्ग' या विषयावर मार्गदर्शन केले. यावेळी श्याम तागडे म्हणाले की, दुःखमुक्तीसाठी शीलपालन आवश्यक आहे. परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संपूर्ण जीवनाकडे पाहिले तर प्रचंड शिक्षण, करुणा, समाजसेवेची जिद्द आणि शीलपालन यामुळे त्यांना कोणाचीही भीती नव्हती. जातीयवादाची तीव्रता असतानाही भारतीय संविधान निर्मितीसाठी त्यांच्याइतका शीलवान नेता दुसरा नव्हता, असे त्यांनी सांगितले. तथागत गौतम बुद्धांनी सांगितलेल्या अष्टांग मार्गाचे गृहस्थांनी पालन करणे आवश्यक असून, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २२ प्रतिज्ञांमधून उपासकांना शीलाधिष्ठित जीवनाचा मार्ग दिला. प्रत्येक नागरिकाने अष्टांग मार्गाचा अवलंब केल्यास सुखमय जीवन जगणे सुलभ होईल, असे तागडे यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमाची सुरुवात सामूहिक बुद्धवंदनेने झाली. अध्यक्ष आदिनाथ शामकुवर यांनी श्याम तागडे यांचे पुष्पगुच्छ व 'दीक्षाभूमी' पुस्तक देऊन स्वागत केले. यावेळी इयत्ता १० वी व १२ वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. सामाजिक चळवळीचे प्रबोधन करणाऱ्या 'जयंती-२' चित्रपटाच्या पोस्टरचे अनावरण श्याम तागडे यांच्या हस्ते करण्यात आले. खीरदान करणाऱ्या प्रतिभा नरेंद्र ढोरे यांचेही स्वागत केले. कार्यक्रमाचे संचालन प्रीती रामटेके यांनी केले. वक्त्यांचा परिचय धर्मेश प्रसेनजीत (फुसाटे) यांनी, तर आभार दीपाली वाघमारे यांनी मानले.

# आर्थिक व्यवहारातील पारदर्शकतेमुळेच सम्राट अशोक पतसंस्थेची प्रगती : ॲड. महेंद्र बनसोड



**नागपूर :** आर्थिक व्यवहारातील पारदर्शकतेमुळेच सम्राट अशोक नागरी सहकारी पतसंस्था आज नावारूपास आली आहे. भविष्यात ही संस्था एका पूर्ण बँकेच्या रूपात उदयास आली पाहिजे, यासाठी मी पूर्णपणे कटिबद्ध आहे, असा विश्वास ॲड. महेंद्र बनसोड यांनी व्यक्त केला. एकेकाळी अत्यंत डबघाईला आलेली ही संस्था आज आर्थिकदृष्ट्या पूर्णपणे सक्षम झाली आहे, याचा मनस्वी आनंद असल्याचे त्यांनी आपल्या सत्कार सोहळ्याप्रसंगी बोलताना सांगितले. सम्राट अशोक नागरी सहकारी पतसंस्था, नागपूर आणि मित्र मंडळाच्या वतीने ॲड. महेंद्र बनसोड यांचा ५१ वा वाढदिवस मोठ्या थाटात साजरा करण्यात आला. या प्रसंगी विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी उपस्थित राहून त्यांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमा दरम्यान दैनिक 'बहुजन सौरभ'चे ज्येष्ठ भागधारक शशिकांत हुमणे यांनी पतसंस्थेने आर्थिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याचे नमूद केले. संस्थेच्या या यशस्वी प्रवासात सर्व संचालकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची राहिली आहे, असे मत ॲड. बी. जी. गजभिये यांनी मांडले. परिसरातील नागरिकांना आवश्यक कर्जवाटप करणे आणि त्याची नियमित वसुली करून संस्थेने मोठी प्रगती साधली आहे, असे बी. टी. वाहणे म्हणाले. तर या पतसंस्थेच्या माध्यमातून ॲड. बनसोड यांनी मोठे आर्थिक आणि सामाजिक कार्य उभारले असल्याचे सी. एम. चव्हाण यांनी आपल्या मनोगतात सांगितले. यावेळी ॲड. महेंद्र बनसोड यांच्या वकील व्यवसायाला २५ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल ॲड. उमेश वाघमारे यांनी त्यांच्या व्यावसायिक प्रवासाचा गौरव केला. दैनिक 'बहुजन सौरभ'च्या वतीने कार्यकारी संपादक विलास गजभिये यांनी ॲड. बनसोड यांना अशोक वृक्ष आणि ५१ पुस्तके भेट देऊन त्यांचा विशेष सत्कार केला. या प्रसंगी प्रकाश सोनटक्के, शांताराम रंगारी, नारायण तिरपुडे, अनिल मेश्राम आणि मोईनुदीन काझी यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे यशस्वी संचालन विजय रामटेके, आभार डॉ. संजय चौधरी यांनी मानले. या सोहळ्याला भीमराव मेश्राम, पंकज पाटील, लीलाधर गाडबैल, लक्ष्मी मेश्राम, शिल्पा बनसोड, दीक्षा लोणारे, लहु चवरे, विनोद राऊत, ओंकार शेंडे यांच्यासह नागरिक व संस्थेचे सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महत्वाचे

### आंबेडकरी नेते ॲड. सुरेश घाटे रूग्णालयात

नागपूर : मागच्या ६०-६५ वर्षापासून सामाजिक व राजकीय क्षेत्रात अन्याय, अत्याचार, हक्क व अधिकाराकरिता लढणारे लढवय्ये व लाँग मार्च नेता, पँथर व कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघाचे १९७४ चे संस्थापक सदस्य व तत्कालीन महासचिव व रिपाई जन मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. सुरेश चंद्र घाटे हे डोके व डोळ्यसच्या जवळ गंभीर दुखापत झाल्यामुळे त्यांना बैद्यनाथ स्थित मेडीकल रोडवरील अरहंत हॉस्पीटल च्या आयसीयु मध्ये भरती करण्यात आले. सोमवारी सकाळी नेहमीप्रमाणे आंघोळ करून निघत असतांना फरशीवरून पाय घसरून पडले. त्यामुळे त्यांच्या डोक्याला व चेहऱ्याला जबर जखम होऊन मोठ्या प्रमाणात रक्त वाहील. मित्रांनी तातडीने त्यांना जवळच्या हॉस्पीटलमध्ये दाखल केले. सध्या त्यांची प्रकृती ठीक असून डॉक्टरांच्या देखरेखीखाली उपचार सुरू आहेत. त्यांच्याकडे लक्ष देण्याकरीता त्यांचे सहकारी राजेश पाटील, शामभाई सोलंकी व कॉम्रेड सरोज मेश्राम सतत लक्ष ठेवून आहे. दोन चार दिवसात दवाखान्यातून त्यांना सुटी मिळण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

### अनुसूचित जाती निधी व विद्यार्थ्यांच्या हक्कांवर ३० ऑगस्टला चर्चासत्र

**नागपूर :** अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वेळेवर न मिळणे, उच्च शिक्षण व स्पर्धा परीक्षा प्रशिक्षणाच्या संधी मर्यादित होणे तसेच मोठ्या प्रमाणावर निधी व्यपगत होत असल्याच्या प्रश्नावर विशेष चर्चासत्राचे आयोजन केले आहे. रविवार, ३० ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी १०.३० वा. बानाई, उरुवेला कॉलनी येथील कॉन्फरन्स हॉलमध्ये हे चर्चासत्र होणार आहे. RTI मधून समोर आलेली माहिती, निधीचा वापर, सोशल ऑडिटची गरज आणि अनुसूचित जाती निधीसाठी स्वतंत्र बजेट कायद्याची आवश्यकता यावर चर्चा होणार आहे. RTI कार्यकर्ते आशीष फुलझेले आणि राजीव खोब्रागडे मार्गदर्शन करणार आहेत. विद्यार्थी, पालक, सामाजिक कार्यकर्ते, कायदे तज्ज्ञ, RTI कार्यकर्ते व जागरूक नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन केले आहे.

### जात वैधता प्रमाणपत्रातील त्रुटींची पूर्तता तातडीने करा : बार्टीचे आवाहन

**पुणे :** शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये विविध व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत केंद्रभूत प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे. या प्रक्रियेत अनेक विद्यार्थ्यांनी उशिराने अर्ज सादर केले असून, काही अर्जांमध्ये जात वैधता प्रमाणपत्रासंदर्भात त्रुटी आढळून आल्या आहेत. संबंधित विद्यार्थ्यांना त्रुटींची पूर्तता करण्याबाबत एसएमएस, ई-मेल व पत्राद्वारे कळविण्यात आले आहे. मात्र, अनेक विद्यार्थ्यांनी अद्याप संबंधित जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांशी संपर्क साधलेला नाही. विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ नये आणि जात वैधता प्रमाणपत्राअभावी कोणताही मागासवर्गीय विद्यार्थी व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेशापासून वंचित राहू नये, यासाठी आवश्यकतेनुसार सुट्टीच्या दिवशीही समित्यांची कार्यालये सुरू ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. ज्या विद्यार्थ्यांनी अद्याप जात वैधता प्रमाणपत्रासंदर्भातील त्रुटींची पूर्तता केलेली नाही, त्यांनी त्वरित संबंधित जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीशी संपर्क साधून आवश्यक कागदपत्रे सादर करावीत, असे आवाहन बार्टीच्या महासंचालक दिपा मुधोळ-मुंडे यांनी केले आहे.

### सारनाथ बुद्ध विहारात भंते संघरत्न शाक्य यांचा वर्षावास

**मुंबई :** सारनाथ बुद्ध विहार, खार पश्चिम येथे नागपूर येथील भंते संघरत्न शाक्य यांचा तीन महिन्यांचा वर्षावास सुरू आहे. सारनाथ बुद्ध विहार कमिटी आणि बुद्ध शासन संवर्धन संघ संस्थेच्या निमंत्रणावरून त्यांचे वर्षावासासाठी आगमन झाले आहे. या परिसराला ऐतिहासिक महत्त्व असून, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी इंग्रजांच्या काळात अनुसूचित जातीच्या लोकांच्या वस्तीसाठी सुमारे २०० एकर जागा राखून ठेवण्यासाठी प्रयत्न केले होते. त्यामुळे या परिसरात बौद्ध समाजाची मोठी संख्या आहे. मुंबईसारख्या महानगरात धम्मदेशनेसाठी विहारात मोठ्या संख्येने उपासक-उपासिका उपस्थित राहणे ही उल्लेखनीय बाब आहे. वर्षावास यशस्वी करण्यासाठी बुद्ध शासन संवर्धन संघ संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पवार, सचिव महेंद्र धोत्रे, सभासद मिलिंद कदम, अनिल सावंत, मनीष जाधव, मंगेश पवार, उमेश जाधव, मंगेश सपकाळ, कल्पना कदम, पुष्पा गमरे, नीता गमरे आणि रीना पवार परिश्रम घेत आहेत.

# चारिका बुद्ध विहारात श्रावण पौर्णिमा साजरी



**नागपूर :** शिल्पा सोसायटीतील चारिका बुद्ध विहारात श्रावण पौर्णिमेनिमित्त २७ ऑगस्ट २०२६ रोजी विविध धार्मिक व धम्मविषयक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी इंद्रजीत वासे होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी तथागत गौतम बुद्ध यांच्या प्रतिमेला उपस्थित उपासक-उपासिकांनी पुष्पांजली अर्पण केली. त्यानंतर सामूहिक बुद्धवंदनेने कार्यक्रमाला सुरुवात झाली. प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित असलेले डॉ. अशोकानंद देशभ्रतार यांनी श्रावण पौर्णिमेचे महत्त्व विशद केले. डॉ. देशभ्रतार म्हणाले की, प्रत्येक पौर्णिमेला बौद्ध धम्माच्या दृष्टीने अनन्यसाधारण महत्त्व आहे. हिंसक डाकू अंगुलीमालाने तथागत बुद्धांच्या चरणी नतमस्तक होऊन उर्वरित आयुष्य धम्माच्या मार्गाने व्यतीत केले. बुद्धांनी सांगितल्याप्रमाणे आचरण करण्याचा आदर्श त्यांनी समाजासमोर ठेवला. त्यामुळेच त्यांच्या विचारांचा जनमानसावर प्रभाव पडला. आज ठिकठिकाणी हजारो व्याख्याने होत असली, तरी व्याख्यानातील विचारांचे प्रत्यक्ष आचरण समाजात कितपत होते, याचे चिंतन-मनन व्याख्यात्यांनीही करणे आवश्यक आहे, असे त्यांनी सांगितले. अनाथपिंडकाची दानपारमिता आणि त्यांना मुखोद्गत असलेली १६० सुत्ते आजच्या युगासाठी दिशादर्शक आहेत, असेही डॉ. देशभ्रतार यांनी नमूद केले. प्रथम बौद्ध संगीतीपासून पुढे झालेल्या बौद्ध संगीतींमुळे धम्माची परंपरा जतन झाली. आचार्य परंपरेतून आणि पुढे त्रिपिटकाच्या लिपिबद्ध स्वरूपातून बौद्ध धम्माचे संवर्धन झाले, असे त्यांनी स्पष्ट केले. अध्यक्षीय भाषणात इंद्रजीत वासे यांनी बुद्धकालीन थेरगाथा व थेरीगाथा यावर प्रकाश टाकला. तसेच अंगुलीमालाच्या सत्यक्रियेने गर्भवती स्त्रीची पीडा कशी दूर झाली, याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन वसंत वाघमारे यांनी केले. श्रावण पौर्णिमेनिमित्त खिरीचे वाटप कल्पना मेश्राम यांच्यावतीने केले. यावेळी संतोष भीमटे, नागसेन गायकवाड, पुष्पा मेंढे, दुर्गा गजभिए, अन्नपूर्णा दुपटे, सीमा कडबे, पुष्पा नगरारे, प्रदन्या कांबळे, सायली डोंगरवार, लीला गजघाटे, पाटील, कडबे यांच्यासह मोठ्या संख्येने उपासक-उपासिका उपस्थित होते. शेवटी धम्मपालन गाथेने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## आम्रपाली बुद्ध विहारात श्रावण पौर्णिमेनिमित्त वृक्षारोपण



**नागपूर :** श्रावण पौर्णिमेनिमित्त आम्रपाली बुद्ध विहार, रमानगर, नागपूर येथे संघरत्नम ट्रस्ट, नागपूरच्यावतीने पर्यावरण संरक्षण व संवर्धनाचा संदेश देत वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी विविध शोभिवंत फुलांच्या रोपांचीही लागवड केली. कार्यक्रमाला बुद्ध विहार समितीचे पदाधिकारी व उपासिका उपस्थित होत्या. याप्रसंगी तथागत बुद्धांचा धम्म आणि पर्यावरण संरक्षण या विषयावर प्रमुख अतिथी संघमित्रा ढोके यांच्याकडून धम्मदेसना देण्यात आली. पर्यावरणाचे संवर्धन ही प्रत्येकाची सामाजिक जबाबदारी असून, वृक्षसंवर्धनातून निसर्गरक्षणाचा संदेश देण्यात आला.

# बुद्धांचा धम्म आचरणातून समजून घ्या : प्रा. माधुरी गायधने



**नागपूर :** बुद्धांचा धम्म केवळ वाचन, पठण किंवा गाथांपुरता मर्यादित न ठेवता तो आचरणातून समजून घेणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन प्रा. माधुरी गायधने-दुपटे यांनी केले. पिपळा फाटा, हुडकेश्वर येथील महिला उपासक-उपासिका वर्गाच्या वतीने वर्षावासानिमित्त आयोजित धम्मदेशना कार्यक्रमात त्या मार्गदर्शन करत होत्या. कार्यक्रमाची सुरुवात बुद्धवंदनेने झाली. त्यानंतर 'बुद्ध आणि त्यांचा धम्म ग्रंथ' वाचन केले. मार्गदर्शन करताना प्रा. माधुरी गायधनी म्हणाल्या की, तथागत बुद्धांनी माणसाची चिकित्सकवृत्ती जागृत केली. आत्मा, परमात्मा, देव, ईश्वर, भूत-प्रेत यांसारख्या अंधश्रद्धांपासून मुक्त होऊन विज्ञान, तार्किकता आणि प्रत्यक्ष अनुभवाच्या आधारावर जीवन जगणे हाच बुद्धांचा खरा धम्म आहे. थेरी किसा गौतमीच्या प्रसंगातून त्यांनी बुद्धांच्या विचारांचे महत्त्व स्पष्ट केले. केवळ विहारात जाऊन गाथांचे पठण केल्याने धम्म आचरणात येत नाही. भावी पिढीला अंधश्रद्धेपासून दूर ठेवण्यासाठी पालकांनी बुद्धांचा खरा धम्म समजून घेणे आवश्यक आहे, असेही त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे संचालन शिल्पा मकेश्वर यांनी केले. सुनंदा रायपुरे यांनी आभार मानले. यावेळी गरीबदास गजभिये, उमेश गजभिये, गया गजभिये, शोभा वाघमारे, विजय वाघमारे, कविता गडपायले, एम. यू. गडपायले, अशा येवले, नलिनी हजारे, वनश्री पाटील, सुजाता भगत, सुरेखा वैद्य, रेखा बागडे, वंदना ताकसांडे, कल्पना बाराहाते, रंजना नाईक, ललिता शामकुवर, मंदा चव्हाण, गंगा चव्हाण, दुर्गा रामटेके, वैशाली रामटेके, डॉली काणेकर, कांचन बुरबुरे, प्रतिभा बुरबुरे, प्रतिभा मेश्राम, जासूदा मेश्राम, मंदा ढाकणे, मंदा मनोहरे, संगीता भगत, वैशाली नागदेवते, आम्रपाली नागदेवे, इंदू नागदेवे, नीतल घुगे यांच्यासह परिसरातील उपासक-उपासिका उपस्थित होते.

# अचलेरचा डॉ. अजित साधना दिलीप लोखंडे ठरला बौद्ध समाजातील पहिला डॉक्टरेट

**संवाद मित्र महेश गायकवाड,**
**सोलापूर, अचलेर :** लोहारा तालुक्यातील अचलेर येथील सर्वसामान्य कुटुंबातील डॉ. अजित साधना दिलीप लोखंडे याने महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथून कृषी विषयात पीएच.डी. पदवी संपादन करून बौद्ध समाजातून डॉक्टरेट मिळविणारा पहिला विद्यार्थी ठरल्याचा दावा करण्यात आला आहे. प्रतिकूल परिस्थितीवर मात करत त्याने मिळविलेल्या या यशाबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे. डॉ. अजित लोखंडे यांनी 'इव्हॅल्युएशन ऑफ ग्रीन सिंथेसाइज्ड नॅनोपार्टिकल्स अगेन्स्ट सीड-बॉर्न पॅथोजन्स ऑफ सोयाबीन' या विषयावर संशोधन केले. महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथील सिनियर सायंटिस्ट डॉ. एस. आर. झांजरे यांच्या मार्गदर्शनाखाली २०२३ ते २०२६ या कालावधीत त्यांनी पीएच.डी.चे संशोधन पूर्ण केले. अजित यांनी २०१६ ते २०२० या कालावधीत दादासाहेब पाटील कृषी महाविद्यालय, संभाजीनगर येथून बी.एस्सी. कृषी, तर २०२० ते २०२३ या कालावधीत वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी येथून एम.एस्सी. कृषीचे शिक्षण पूर्ण केले. वडिलांना आलेल्या दुर्धर आजारासह अनेक अडचणींचा सामना करत त्यांनी शिक्षणाचा प्रवास खंडित होऊ दिला नाही. या यशामध्ये आई साधना लोखंडे, दिवंगत वडील दिलीप लोखंडे, मोठे बंधू यशवंत लोखंडे, नातेवाईक, मित्रपरिवार आणि प्राथमिक शाळेपासून मार्गदर्शन करणाऱ्या सर्व गुरुजनांचे मोलाचे योगदान असल्याचे डॉ. अजित लोखंडे यांनी सांगितले. डॉ. अजित लोखंडे यांच्या या यशाबद्दल अचलेर परिसरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या जात आहेत.



# आदिवासी विद्यार्थ्यांना न्याय मिळावा; बसपाचे प्रदेशाध्यक्ष ॲड. सुनील डोंगरे यांची भेट



**नागपूर :** आदिवासी विद्यार्थ्यांना वयाची अट घालून उच्च शिक्षणापासून वंचित ठेवणारा ५ ऑगस्ट २०२६ रोजीचा शासकीय आदेश रद्द करावा, यासह १५ मागण्यांसाठी राज्यातील ४९० वसतिगृहांतील हजारो आदिवासी विद्यार्थी मागील पंधरा दिवसांपासून आंदोलन करीत आहेत. या आंदोलनाला पाठिंबा देत बसपाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष ॲड. सुनील डोंगरे यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने नागपुरातील आदिवासी विकास विभागाच्या अपर आयुक्त आयुषी सिंह यांची भेट घेतली. त्यांच्या माध्यमातून आदिवासी मंत्र्यांना मागण्यांचे निवेदन देण्यात आले. निवेदनात उच्च शिक्षणासाठी वयाची अट रद्द करणे, विद्यार्थ्यांच्या तुलनेत वसतिगृहांची संख्या वाढवणे, प्रत्येक जिल्ह्यात एक हजार क्षमतेचे वसतिगृह उभारणे, रिक्त पदे भरणे, उत्पन्नाची मर्यादा वाढवणे, पं. दीनदयाळ उपाध्याय स्वाधार योजना नियमित राबवणे, प्रवेशाच्या दिवसापासून डीबीटी लागू करणे,महागाई निर्देशांकानुसार शिष्यवृत्ती व फेलोशिप वाढवणे, प्रत्येक वसतिगृहात भोजनाची व्यवस्था करणे, सुसज्ज वाचनालय व अभ्यासिका निर्माण करणे तसेच प्रत्येक आदिवासी विद्यार्थ्याचा एक कोटी रुपयांचा विमा उतरविणे आदी मागण्या केल्या. ष्टिमंडळात बसपाचे प्रदेश महासचिव इंजि. दादाराव उईके, प्रा. डॉ. मोहन राईकवार, मंगेश ठाकरे, महिला नेत्या प्रा. डॉ. विद्या राईकवार, प्रदेश मीडिया प्रभारी उत्तम शेवडे, जिल्हाध्यक्ष योगीराज लांजेवार, रोहित इलपाची, ॲड. वीरेश वरखडे, फिरोज भाई, अमित गजभिये, सुमित चव्हाण आदी उपस्थित होते.

## बार्टी फेलोशिपसाठी संशोधक विद्यार्थ्यांचे आंदोलन तीव्र

**पुणे :** बार्टी फेलोशिपच्या मागणीसाठी पुण्यातील समाजकल्याण आयुक्तालयासमोर सुरू असलेल्या संशोधक विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला अधिक तीव्र स्वरूप आले आहे. २५ ऑगस्टपासून सुरेखा वासनिक आणि किरण देवकरे आमरण उपोषणाला बसले असून, आज त्यांच्या उपोषणाचा चौथा दिवस आहे. अन्नत्यागामुळे दोन्ही उपोषणकर्त्यांची प्रकृती खालावल्याचे आंदोलनकर्त्यांनी सांगितले. दरम्यान, आजपासून १२ संशोधक विद्यार्थ्यांनी चक्री उपोषण सुरू केले आहे. २०२३, २०२४ आणि २०२५ मधील सर्व पात्र अनुसूचित जातीच्या संशोधक विद्यार्थ्यांना सरसकट बार्टी फेलोशिप द्यावी, वयोमर्यादा व क्रीमीलेयरची अट रद्द करावी, पोस्ट-डॉक्टोरल फेलोशिप सुरू करावी तसेच वार्षिक भत्ता, घरभाडे व आवश्यक आर्थिक सहाय्य द्यावे, अशा प्रमुख मागण्या विद्यार्थ्यांनी केल्या आहेत. उपोषणकर्त्यांची प्रकृती खालावत असतानाही शासनाने तातडीने दखल घ्यावी, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली असून, मागण्या मान्य होईपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याचा निर्धार संशोधक विद्यार्थ्यांनी व्यक्त केला आहे.

## आजचे कार्यक्रम

### नालंदा बुद्ध विहार जयताळा'

**विषय** : 'बुद्ध आणि त्यांचा धम्म' वर प्रबोधन
**दिनांक** : ३० ऑगस्ट २०२६ रोजी
**स्थळ** : भीमोदय बुद्ध विहार, विश्वकर्मा नगर, नागपूर
**वेळ** : सकाळी आठ वाजता
**प्रबोधनकार** : गुलचंद रंगारी
**आयोजक** : आरबीएम नागपूर युनिट व भीमोदय मंडळ बुद्ध विहार

### नालंदा बुद्ध विहार जयताळा

रविवार दि. 30 8 26
सकाळी आठ वाजता
**धम्मप्रवचन** : महामंगल सूत्तवर इंजि. शुद्धोधन बडवणे, अध्यक्ष धम्म प्रचार समिती राष्ट्रीय बौद्ध महासभा
**आयोजक** : अध्यक्ष विकास बनकर व सुरेंद्र आवळे

### जेष्ठ कवी मधुकर गजभिये व कवी माया नामदेव कांबळे आदरांजली सभा

**रविवार दिनांक ३० ऑगस्ट २०२६ . दुपारी २ वा.**
**स्थळ :** डॉ भूषण भस्मे यांचे विमेंन्स विंग्स फिटनेस सेंटर काशीनगर, रामेश्वरी रोड नागपूर अध्यक्षः भदंत नागदिपंकर, विलास गजभिये, अनिल वासनिक
सूचना कविमित्र चार ओळी स्मृतीशेषांप्रती सादर करतील.

### सकल ओबीसी महामोर्चा बैठक

**दि. :** ३० ऑगस्ट, २०२६
**वेळ दुपारी ०३ वाजता**
**स्थळ:** रविभवन, मोठे सभागृह पहिला माळा, सिव्हिल लाइन्स, नागपूर.
**विषय :** ओबीसींच्या स्वतंत्र कॉलमसह जातिनिहाय जनगणना झालीच पाहिजे या मागणीसाठी १ सप्टेंबर, २०२६ पासून भारतभर सुरु होणाऱ्या महा आंदोलन
**आयोजक :** उमेश कोर्राम मुख्य संयोजक

# अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अटी शिथिल करण्याची मागणी



**नागपूर :** अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणातील जाचक अटी रद्द अथवा शिथिल करण्याच्या मागणीसाठी मुख्यमंत्री व समाजकल्याण मंत्र्यांना निवेदन दिले. मुख्यमंत्री कार्यालय व पोलीस आयुक्तालयातील भेटीच्या अनुषंगाने हे निवेदन सादर केले.
निवेदनात दोन अभ्यासक्रमांमध्ये तीन वर्षांचा खंड असल्यास फ्रीशिप न देण्याची अट रद्द करावी, ३० वर्षांपेक्षा जास्त वयाच्या विद्यार्थ्यांना वसतिगृह प्रवेश नाकारण्याची अट रद्द करावी, तसेच स्वाधार योजनेतील दोन वर्षांचा शैक्षणिक खंड व ३० वर्षांची कमाल वयोमर्यादा शिथिल करावी, अशा मागण्या केल्या.
वसतिगृह प्रवेश प्रक्रियेत अनुसूचित जातीतील कोणत्याही एका जातीला ३० टक्क्यांपेक्षा अधिक प्रवेश देऊ नये, अशी अट असली तरी इतर अनुसूचित जातींमधून पात्र अर्ज उपलब्ध नसल्यास उपलब्ध पात्र विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात यावा, अशी मागणीही केली.
अनुसूचित जातीतील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या समान संधी मिळाव्यात आणि जाचक अटींमुळे कोणताही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये, यासाठी शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी संघमित्रा ढोके आणि प्रतिनिधींनी दिलेल्या निवेदनातून करण्यात आली.

# देहू रोड प्रेरणाभूमीतून राष्ट्रीय प्रचारक प्रशिक्षण प्रक्रिया गतिमान होईल : भीमपुत्र टेक्सास गायकवाड

## तीन दिवसीय राष्ट्रीय प्रचारक प्रशिक्षण शिबिराचे उद्घाटन



**पुणे :** देहू रोड येथील ऐतिहासिक धम्मभूमीला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पावन स्पर्शाने, धम्म उपदेशाने आणि बुद्धमूर्ती दान देऊन प्रतिष्ठापित केल्यामुळे या भूमीला विशेष प्रेरणास्थानाचे महत्त्व प्राप्त झाले आहे. याच ऐतिहासिक भूमीला बुद्ध विहार समन्वय समितीने राष्ट्रीय प्रचारक प्रशिक्षण केंद्र म्हणून कार्यान्वित केले असून, येथून राष्ट्रीय प्रचारक प्रशिक्षणाची प्रक्रिया अधिक गतिमान होईल, असा विश्वास धम्मभूमीचे अध्यक्ष भीमपुत्र टेक्सास गायकवाड यांनी व्यक्त केला. देहू रोड, पुणे येथील ऐतिहासिक धम्मभूमीत बुद्ध विहार समन्वय समितीच्या वतीने आयोजित तीन दिवसीय राष्ट्रीय प्रचारक प्रशिक्षण शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. देहू रोडच्या या भूमीला ऐतिहासिक संदर्भ असून, संत तुकाराम महाराज घोड्यावरून पुण्याकडे जात असत, तर छत्रपती शिवाजी महाराज संत तुकाराम महाराजांच्या दर्शनासाठी याच मार्गाने जात असत, असे सांगून गायकवाड यांनी या भूमीचे ऐतिहासिक आणि धम्मविषयक महत्त्व अधोरेखित केले. अशा प्रेरणादायी भूमीवर राष्ट्रीय स्तरावरील प्रचारक प्रशिक्षण केंद्र सुरू होणे ही ऐतिहासिक बाब असल्याचे त्यांनी नमूद केले. अध्यक्षीय भाषणात अशोक सरस्वती बौद्ध यांनी राष्ट्रीय प्रचारक प्रशिक्षण शिबिराच्या आयोजनाची आवश्यकता स्पष्ट केली. बुद्ध विहार समन्वय समितीला अधिक संघटित आणि कॅडर बेस संघटना बनविण्याचा संकल्प त्यांनी व्यक्त केला. प्रशिक्षित प्रचारकांच्या माध्यमातून बुद्ध, धम्म आणि संविधानाच्या विचारांचा व्यापक प्रसार करण्यावर त्यांनी भर दिला. उद्घाटन सत्राचे संचालन बुद्ध विहार समन्वय समिती, पश्चिम महाराष्ट्र शाखेचे अध्यक्ष राहुल खांडेकर यांनी केले. समितीचे महासचिव डॉ. आनंद भालेराव यांनी प्रास्ताविकातून शिबिराची भूमिका आणि उद्दिष्टे स्पष्ट केली. ऐतिहासिक धम्मभूमी देहू रोड बुद्ध विहार कृती समितीचे कोषाध्यक्ष बापूसाहेब गायकवाड यांनी आभार प्रदर्शन केले.

बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एआय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. RNI No. MAHMAR 2020/84035 Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648